सुविचार

जो व्यक्ति अपने आप को सही- सही समझ लेता है वही अपना सच्चा साथी बन सकता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शनिवार दि. ८ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२० ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# गरीबांचे कल्याण हे एनडीएचे ध्येय

## सर्वसामान्यांच्या स्वप्नातील नवा भारत उभा करु



नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्लीतील जुन्या संसद भवनातील सेंट्रल हॉलमध्ये एनडीएच्या सर्व नवनिर्वाचित खासदारांची तसेच घटक पक्षांच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत नरेंद्र मोदी यांची एकमताने एनडीएच्या नेतेपदी निवड करण्यात आली असून रविवारी ९ जूनला संध्याकाळी ६ वाजता नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. या बैठकीत सर्व घटकपक्षांच्या प्रमुख नेत्यांची भाषणे झाली. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही लांबलचक भाषण करत, घटकपक्षांचे आभार मानले. तसेच, आजचा क्षण माझ्यासाठी भावूक असल्याचे सांगत नरेंद्र मोदींनी एनडीएची बीजं रोवणाऱ्या देशातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांची नावे घेतली. त्यामध्ये, दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचंही नाव मोदींनी घेतले. तसेच, दिवंगत अटलबिहारी वाजपेयींसह एनडीच्या स्थापनेतील दिग्गज नेत्यांचा उल्लेख करत त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला.

मोदींनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच म्हटले की, एनडीए घटकपक्षाचे सर्व नेते, नवनिर्वाचित खासदारांचे मी मनापासून आभार मानतो. माझ्यासाठी ही आनंदाची बाब आहे की इतक्या मोठ्या समुहाचं स्वागत करण्याची संधी मला मिळाली. जे खासदार निवडून आले आहेत ते अभिनंदनाचे अधिकारी आहेत. पण, ज्या लाखो कार्यकर्त्यांनी दिवसरात्र मेहनत करुन, इतक्या भयंकर गरमीत परिश्रम घेतले त्या सर्व कार्यकर्त्यांना या संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमधून डोकं टेकून वंदन करतो, असे म्हणत मोदींनी देशभरातील भाजप कार्यकर्त्यांचे आभार मानले.

पुढे बोलताना मोदींनी म्हटले की, तुम्ही सर्व सदस्यांनी माझी नेतेपदी निवड करुन माझ्यावर नवी जबाबदारी दिली आहे. मी आपल्या सर्वांचा खूप खूप आभारी आहे. व्यक्तिगत जीवनात मी जबाबदारीची जाणीव ठेवतो. २०१९ मध्ये या सभागृहात मी बोलत होतो, ज्यावेळी माझी नेतेपदी निवड केली होती त्यावेळी म्हणालो होतो विश्वास.. आज मी परत म्हणतो, माझ्यावर जे दायित्व दिलं आहे, त्याचं कारण आपला एकमेकांप्रती विश्वास आहे. आपलं अतूट नातं विश्वास मजबूत करतं, (पान २ वर)

### रक्ताचे नमुने बदलण्याचा सल्ला डॉ. तावरेंनी दिला

पुणे : पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणाचा सखोल तपास सुरु असून दररोज नवनवीन खुलासे होत आहेत. या अपघात प्रकरणाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची सध्या कसून चौकशी सुरु असून या प्रकरणात विशाल अग्रवालच्या मुलाचे ब्लड रिपोर्ट बदलण्यात आल्याची धक्कादायक माहिती काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. याप्रकरणी पोलिसांनी ससून रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक करण्यात केली होती.

आता या डॉक्टरांना रक्त बदलण्याचा सल्ला नेमका कुणी दिला याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित असताना अश्फाक मकानदार आणि ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागाचे अधीक्षक डॉ. अजय तावरे डॉ. तावरे यांनीच रक्त बदलण्याचा सल्ला दिल्याची माहिती (पान २ वर)

# एकीकडे मोदींच्या शपथेची तयारी दुसरीकडे फडणवीस-अमित शाहा यांच्यात बैठक

मुंबई,७ - लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता एनडीएकडून सरकार स्थापनेसाठी प्रयत्न केला जातोय. एनडीएतील सर्व घटकपक्षांनी भाजपल्या पाठिंब्याचे पत्र दिले आहे. आज (७ जून) मोदी यांची एनडीएच्या नेतेपदी निवड करण्यात आली. दुसरीकडे या निवडणुकीनंतर महाराष्ट्रातही मोठ्या घडामोडी घडत आहेत. जागा कमी झाल्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यानंतर आज फडणवीस हे दिल्लीत असून ते केंद्रातील भाजपच्या नेत्यांशी चर्चा करणार आहेत.

फडणवीस दिल्लीत, अमित शाहांसोबत करणार महत्त्वाच्या विषयांवर चर्चा

फडणवीस हे आज दिल्लीच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान तेआज पुन्हा एकदा केंद्रीय गृहमंत्री अमित यांची भेट घेणार आहेत. काल (६ जून) रात्री अमित शाह यांच्या निवासस्थानी दोघांमध्ये दिड तास चर्चा झाली होती. या चर्चेत सरकारमधून बाहेर पडण्याची माझी भुमिका ही कोणत्याही नाराजीतून नाही तर राज्यात पक्षसंघटनेला बळकटी आणण्यासाठीच आहे अस देवेंद्र फडणवासांनी अमित शाह यांना सांगितल्याच कळतंय. याशिवाय संघटनेच्या कामात तळागाळातील कार्यकर्ता ते स्थानिक पातळीवरचे प्रश्न सम जून घेत विधानसभेची जोरदार मोर्चेबांधणी करता येईल, सरकारच्या बाहेर राहून देखील सरकार व्यवस्थित चालवता येऊ शकत असा विश्वासही दिला.

अंतिम निर्णय भाजपचे नेतृत्त्व घेणार

सरकारमधून राजिनाम्याच्या भूमिकेचा अंतिम निर्णय हे भाजप नेतृत्त्वच घेईल मात्र त्यांना माझा निर्णय योग्य कसा आहे, हे पटवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न देवेंद्र फडणवीसांकडून केला जाणार असल्याची माहिती आहे. आज दुपारनंतर पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांची भेट होईल त्या दरम्यान ही चर्चा होण अपेक्षित आहे.

महाराष्ट्राच्या राजकाणात मोठ्या घडामोडी

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर देश तसेच राज्यातील राजकीय स्थिती बदलली आहे. अजित पवार (पान २ वर)

# अंतराळवीर सुनिता विल्यम्सची मोठी कामगिरी तिसरी अवकाश झेप यशस्वी



मुंबई : भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स १ जून रोजी तिसऱ्यांदा अंतराळ प्रवासाला जाणार होती. मात्र हा प्रवास अंतिम टप्प्यात येऊन यंत्रणा बिघाडामुळे पुढे ढकलण्यात आला होता. त्यामुळे सुनीता विल्यम्सची तिसरी झेप लांबणीवर गेली होती. त्यानंतर आता सुनिता विल्यमस यांची तिसरी अवकाश भरारी यशस्वी झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणाऱ्या या पहिल्या सदस्य बनून त्यांनी नवा इतिहास रचला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी काल संध्याकाळी केप कॅनाव्हेरल येथील प्रक्षेपण तळावरून बोईंगच्या स्टास्लाइनर अंतराळयानातून झेप घेतली. विल्यम्स आणि तिचे सहकारी बुच विल्मोर यांचे हे उड्डाण काही तांत्रिक समस्यांमुळे पूर्वी दोन वेळा रद्द करण्यात आले होते. मात्र, काल यानाने यशस्वीरित्या झेप घेतली आहे.

बोईंग क्रू फ्लाइट टेस्ट (सीएफटी) नावाचे हे मिशन नासाच्या कमर्शियल क्रू प्रोग्रामच्या रुपात सुरू करण्यात आले होते. इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर नियमित क्रू फ्लाइटसाठी स्टारलाइनर प्रमाणित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असणार आहे. हे मिशन यशस्वी ठरल्यास अंतराळवीरांना कक्षेतील (पान २ वर)

# मानहानी प्रकरणात राहुल गांधींना जामीन

बंगळूरू : काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांना मानहानीच्या केसमध्ये बंगळूरुच्या स्पेशल कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. हे प्रकरण मागच्या विधानसभा निवडणुकांमधले आहे. तेव्हा राहुल गांधींनी तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यावर गैरव्यवहाराचा आरोप केला होता. त्यानंतर राहुल गांधींवर त्यांनी खटला दाखल केला होता.

या प्रकरणी भाजपचे वकील विनोद यांनी म्हटले की, २०२३च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने एक जाहिरात प्रकाशित केली होती. ज्यात भाजप ट्रबलमेकर सरकार आहे असे म्हटले होते. हा खोटा आरोप होता. आरोपींपैकी दोघांना जामीन मिळाला आहे. याप्रकरणी राहुल गांधींनी स्वत: हजर होण्यापासून मुभा मागितली होती.

या प्रकरणी काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यासह मुख्यमंत्री सिद्धरामय्या हेसुद्धा आरोपी आहेत. परंतु कोर्टाने दोघांनीही जामीन दिलेला आहे. कर्नाटक भाजपने काँग्रेसवर आरोप करत वर्तमानपत्रांमधून खोटो आरोप केल्याचा आरोप केला होता. शिवाय राहुल गांधींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ती जाहिरात शेअर केली होती.

# मुंबईकरांनो, पुढील ४८ तासात जोरदार पावसाचा इशारा

## कोकणासह मराठवाड्याला यलो अलर्ट

मुंबई,७ - महाराष्ट्रात पुढील ४८ तासात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण, मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. आज आणि उद्या दक्षिण कोकणात बहुतेक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. उत्तर कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी आणि उत्तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे.

मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात पावसाचा अंदाज

पुढील ४८ तासात मुंबई, ठाणे, पालघरसह कोकण आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आयएमडीने या भागात पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात विविध ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या दोन ते तीन दिवसात मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातही पावसाची रिमझिम सरी पाहायला मिळाल्या आहेत. नागरिकांचे डोळे मान्सूनकडे लागले आहेत. सध्या राज्यात मान्सूनसाठी अनुकूल वातावरण असून मान्सून लवकरच महाराष्ट्रात दाखल होईल, अशी अपेक्षा आहे.

राज्यात अनेक जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट

आज ठाणे, मुंबई, पालघर, रायगड या भागात पावसाची हजेरी लागण्याचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे. याशिवाय, जळगाव, (पान २ वर)

# यंदा राज्यात सरासरीच्या ५ टक्के अधिक पाऊस

पुणे : यंदा राज्यात सरसरीच्या तुलनेत अधिक ५ टक्के पावसाची शक्यता आहे. तसेच वाऱ्याचा वेग, सूर्यप्रकाशाचा कालावधी आणि कमी तापमान याचा परिणाम म्हणून जून आणि जुलै महिन्यात धुळे, राहुरी, अकोला, पाडेगाव, पुणे, कोल्हापूर येथे पावसात खंड राहण्याची शक्यता जेष्ठ कृषी हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी पत्रकार परिषदेत वर्तविली आहे.

आगामी दोन दिवसात राज्याच्या विविध भागात वीजांच्या कडकडाटासह मेघ गर्जना आणि वादळी वाऱ्यासाह पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. दरम्यान राज्याच्या काही भागात दाखल झालेल्या मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी अनुकूल वातावरण असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान यंदा राज्यात सरासरी ९९ टक्के पावसाचा अंदाज असून ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण चांगले राहील असे हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीतील पावसाचा अंदाज त्यांनी व्यक्त केला. दक्षिण कोकण ,उत्तर कोकण,दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी आणि उत्तर मध्य महाराष्ट्र या भागात दमदार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे तर बहुतांशी भागात मध्यम ते तुरळक स्वरुपाच्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

साबळे म्हणाले यंदा राज्यात सरसरीच्या तुलनेत अधिक ५ टक्के पावसाची शक्यता आहे. तसेच वाऱ्याचा वेग, सूर्यप्रकाशाचा कालावधी आणि कमी तापमान याचा परिणाम म्हणून जून आणि जुलै महिन्यात धुळे, राहुरी, अकोला, पाडेगाव, पुणे, कोल्हापूर येथे पावसात खंड राहण्याची शक्यता आहे. तसेच दापोली ,नागपुर, निफाड, सोलापूर, जळगाव परभणी येथे पावसाच्या खंडाचा कालावधी कमी राहण्याची शक्यता आहे. कमी दिवसात अधिक पाऊस आणि काही (पान २ वर)



देवघर निवासस्थानी लातूरचे Times Now Marathi चे पत्रकार आमचे स्नेही श्री शशिकांतजी पाटील यांना मा भुवनेश्वरी इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी कडून डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्याबद्दल डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जनतेचा विश्वास पुन्हा मिळविण्यासाठी जीवाचे रान करू



मुंबई : लोकशाहीमध्ये जनता जनार्दन सर्वस्व असते. जनतेने दिलेला कौल विनम्रपणे आम्ही स्वीकारलेला आहे. जनतेचा आमच्याबद्दलचा जो काही विश्र्वास कमी झालेला आहे, तो विश्र्वास पुन्हा संपादन करण्याकरीता आम्ही जीवाचे रान करू, असा विश्र्वास राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

आमदारांशी चर्चा केल्यानंतर काही नोंदी घेतल्या असून त्यातून काही निर्णय घेऊन आम्ही पुढची वाटचाल करणार आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि महायुतीचा दारुण पराभव झाल्यानंतर गुरुवारी सकाळी अजित पवार गटाच्या कोअर कमिटीची बैठक आणि त्यानंतर सायंकाळी ट्रायडेंट हॉटेलमध्ये आमदारांची बैठक पार पडली. त्यानंतर रात्री अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे उपस्थित होते. या दोन्ही बैठकीत लोकसभेत कशाप्रकारे निकाल लागले याबद्दल चर्चा करण्यात आली.

अजित पवार म्हणाले की, आमचे आमदार विरोधकांच्या संपर्कात आहेत, अशा ज्या बातम्या येत आहेत त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. सर्व आमदार आमच्यासोबत आहेत. हे चित्र आजच्या बैठकीत पहायला मिळाले, असेही अजित पवार (पान २ वर)

# जागतिक पर्यावरणदिनी जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेस प्रारंभ




लातूर, / प्रतिनिधी- आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यासाठी माझा जिल्हा, हरित जिल्हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या व्यापक स्वरुपात मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेला जागतिक पर्यावरण दिनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या उपस्थित महाराणा प्रतापनगर ग्रामपंचायत येथून प्रारंभ झाला.

नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, लातूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील वन क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. आगामी पावसाळ्यात ग्रामीण भागात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्यासाठी रोपवाटिका निर्मिती आणि सीड बॉल निर्मितीसाठी गेल्या काही दिवसांपासून वृक्ष बियांचे संकलन ग्रामपंचायत स्तरावर करण्यात आले आहे. या बियांपासून सीड बॉल निर्मित, रोपवाटिका निर्मितीसह वृक्ष लागवड मोहिमेला आज जिल्ह्यातील सर्व ७८६ ग्रामपंचायतीमध्ये सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एकाच दिवशी किमान दहा झाडे लावण्याचा निश्चय करण्यात आला होता. महाराणा प्रतापनगर ग्रामपंचायतीमधील म्हाडा कॉलनी येथे (पान २ वर)

### प्रफुल्ल पटेल यांना मोठा दिलासा

मुंबई,७ - राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पिएमएलए कायद्यांतर्गत वरळीयेथील त्यांच्या मालकीच्या १२ व्या आणि १५ व्या माळ्यावरील फ्लॅटची जप्ती ईडीने रद्द केली आहे. जप्त करण्यात आलेल्या सीजे हाऊस फ्लॅटची किंमत जवळपास १८० कोटीच्या घरात असल्याची माहिती समोर येते आहे. आता प्रफुल्ल पटेल यांच्या घरावरील एची जप्ती उठली आहे.

ए ने २०२२ मध्ये पटेल यांच्यासह त्यांची पत्नी वर्षा आणि त्यांची कंपनी मिलेनियम डेव्हलपर्स यांच्या मालकीचे किमान सात फ्लॅट्स जप्त केले होते. गँगस्टर इक्बाल मिर्ची याच्या पत्नीकडून ही प्रॉपर्टी पटेल यांनी बेकायदेशीरपणे खरेदी केल्याचा आरोप केला होता. (पान २ वर)

# शहर स्वच्छतेसाठी रात्री उशिरापर्यंत मनपा अधिकारी व कर्मचारी राबले



लातूर/ प्रतिनिधी :- गुरुवारी सायंकाळी शहरात झालेल्या जोरदार पावसानंतर विविध भागात तुंबलेल्या पाण्याला रस्ता करून देत शहर स्वच्छतेसाठी मनपाचे अधिकारी व कर्मचारी रात्री उशिरापर्यंत राबले. शहरात ज्या ठिकाणी पाणी साठले होते तो संपूर्ण परिसर स्वच्छ केल्यानंतरच हे अधिकारी व कर्मचारी आपापल्या घरी पोहोचले.

गुरुवारी सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला.यामुळे शहरातील कांही सखल भागात पावसाचे पाणी साठले. अचानक झालेल्या मोठ्या पावसामुळे पाण्याचा लवकर निचरा झाला नाही.शहरातील सरस्वती कॉलनी,सौभाग्य नगर, बरकत नगर,चाणक्य सोसायटी,उस्मानपुरा,नाना-नानी पार्क,नवविकसित एसटी हाऊसिंग सोसायटी, केशवनगर, इस्लामपुरा,डी मार्ट,मंत्री नगर,देशमुख नगर, रेणापूर नाका,कन्हेरी,जुने जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम भवन या भागातील नाले तुंबले होते. त्यामुळे सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते.

ही बाब लक्षात आल्यानंतर मनपा (पान २ वर)



# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

लातूर, ता.०६ : दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते प्रा. अजय चव्हाण यांनी रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेल्या राज्यकारभार होय. हे रयतेचे राज्य चिरंतन राहावे म्हणून ०६ जून १६७४ रोजी रायगडावर महाराजांचा राज्यभिषेक झाला. शिवाजी महाराज छत्रपती झाले. याच दिवशी शिवकालगणनेला प्रारंभ झाला. तो हा शुभ दिन असल्याचे प्रा. चव्हाण यांनी सांगितले. आभार ग्रंथपाल विठ्ठल जाधव यांनी मानले.

कार्यक्रमास बीसीए विभागप्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते डॉ. बी. जी. खटाळ आदि प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकरसह वरिष्ठ लिपिक ज्ञानेद्र कातपुरे, शिवाजी पांचाळ, ग्रंथालय लिपिक लक्ष्मीकांत वाघ यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजचे नीट परीक्षेत दैदिप्यमान यश

लातूर / प्रतिनिधी– जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज एमआयडीसी, लातूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवत पाच विद्यार्थ्यांनी यशस्वी भरारी घेऊन स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजचा नावलौकिक वाढविण्याचे काम केलेले आहे.

यामध्ये स्वामी विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील रामनिवास मगर या विद्यार्थ्यांने ६६० गुण, राहुल खराटे ६१७, उन्मेश्वर राठोड ६१४, गौरी राठोड ५९३ तर वृषाली गुडसुरे या विद्यार्थीनीने ५८७ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या नीट परीक्षेतील यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती समितीच्यावतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा

धाराशिव (प्रतिनिधी) – छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी चौकात दि.६ जून रोजी साजरा करण्यात आला .

प्रारंभी समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर फुलांच्या माळांनी व गुलाबांच्या पाकळ्यांनी सजवला होता. फटाक्यांची आतषबाजी व ढोल ताशांच्या दणदणाटाने चौक दणाणून गेला. तर यावेळी मिठाई वाटप करून शिवराज्याभिषेक सोहळ्याचा आनंद साजरा केला.



यावेळी मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, माजी अध्यक्ष आशिष मोदाणी, अग्निवेश शिंदे, उमेश राजेनिंबाळकर, धनंजय राऊत, अनंत जगताप, बालाजी तांबे, सिद्धार्थ बनसोडे, भालचंद्र कोकाटे, शहाजी भोसले, कुणाल निंबाळकर, मुकुंद घाडगे, राजेश बंडगर, आदित्य शिंदे, शिवराज कापसे, अविनाश जाधव, ज्ञानेश्वर पंडित, शितल देशमुख, जयपाल शेरखाने, नानासाहेब बोराडे, चंद्रकांत इंगळे, खंडू राऊत, किशोर राऊत, सौरभ गायकवाड, प्रमोद कोराळे, चंद्रकांत इंगळे, सुरज जिंतपुरे, महेश उपासे, रुद्र भुतेकर, ओंकार बांगर आदीसह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी महाविद्यालयाचे नीट परीक्षेत घवघवीत यश



चापोली / प्रतिनिधी- चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाने नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्याबद्धल सर्वस्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

संजीवनी महाविद्यालयातील ओमकार शंकर डोंगरे व आदित्य प्रकाशराव फड या विद्यार्थ्यांनी ६५१ गुण मिळवत महाविद्यालयातून नीट परीक्षेत प्रथम आले आहेत. तसेच सायदा फासिहा अदिन हाशमी शफिक अहमद या विद्यार्थिनीने ५८३ गुण मिळवत द्वितीय तर गिरीराज वैजनाथ मद्रेवार या विद्यार्थ्याने ५५७ गुण मिळवत तृतीय आला आहे. तसेच संगमेश्र्वर भिमाशंकर सातपुते ५४८ गुण, धनंजय शरद कागणे ५३१ गुण व शेख मरियम अमारा झाकी मोहम्मद ५०५ गुण मिळाले आहेत. नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, विश्र्वनाथ शेटकर, डॉ. रामराव दुडीले, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयचे उपप्राचार्य रमेश गुट्टे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. नामदेव नलवाड, प्रा. विजय गुळवे, प्रा. डॉ. फुलचंद चाटे, प्रा. महेंद्र वळसंगीकर, प्रा. सौ संयोगिता बनसोडे, प्रा. सचिन साळुंके, प्रा. डॉ. अतुल धावारे, प्रा. डॉ. माधव कागणे, प्रा. गायकवाड, प्रा. नितीन आवस्कर, प्रा. बाबासाहेब घुले, प्रा. सौ कांबळे, प्रा. महेश कराड सह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचार्यांनी अभिनंदन केले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे नीट परिक्षा २०२४मध्ये घवघवीत यश

लातूर / प्रतिनिधी– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने नीट २०२४ परीक्षेमध्ये याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत महाविद्यालयातील सोळंके तन्वी हंसराज हिने ७२० पैकी ६७० गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला तसेच शेख सोहेल अब्दुल गणी यांनी ५७८ गुण घेऊन महाविद्यालयातून दुसरा क्रमांक पटकावला तसेच माळी सुशांत हनुमंत यांनी ५७५ गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला तसेच नोकजा विजय अनिल कुमार ५०३ गुण, जोशी दिशा दिनेश ४५३ गुण, शेख सुजान बशीर ४१८ गुण व जोद्राने श्रद्धा सिद्धेश्वर ४०५ गुण घेऊन अनुक्रमे चौथा, पाचवा, सहावा व सातवा मान येण्याचा महाविद्यालयामध्ये पटकावला. तसेच महाविद्यालयातील डॉ. रत्नाकर बेडगे यांची कन्या रेणुका रत्नाकर बेडगे हिने ६२५ गुण, डॉ. भास्कर नल्ला रेड्डी यांची कन्या मेधा भास्कर रेड्डी हिने ४४० गुण प्राप्त केले. या सर्व गुणवंत व गुणवान



विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पेढे देवून सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक प्रा. व्ही.सी.पाटील, प्रा.एस.एम. पाटील, प्रा.डॉ.गुणवंत बिरादार, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. एम. डी. बोळेगावे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते. महाविद्यालयाने घेतलेल्या दर रविवारच्या सराव परीक्षेमुळे उज्वल यश मिळण्यासाठी मदत झाली. सर्व प्राध्यापकानी वेळोवेळी शंकांचे समाधान केले असे मत गुणवंत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. तसेच पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोर्ड समन्वयक प्रा.व्ही.सी.पाटील यांनी केले तर आभार प्रा.के. आर सूर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. अश्विनी रोडे, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशस्वीतेसाठी नंदू काजापुरे, राजाभाऊ बोडके, अशोक शिंदे, आनंद खोपे, ज्योतीराम वलांडे आणि राम पाटील यांनी परिश्रम घेतले.

# पंधरा एकर माळरानाचे नंदनवन करणारा पानभोसी चा फॉरेस्ट मॅन शिवसांब घोडके

## निसर्ग सेवा गट पानभोसी चा दररोज एक रोप लागवड चळवळीचा आज ८९१ वा दिवस

**शिवानंद स्वामी**

कंधार : एखाद्या कामाला चळवळीचे रूप लाभले आणि लोकसहभाग मिळाला की त्याचे महत्व अधोरेखित होण्यास वेळ लागत नाही. अशीच एक कहाणी आहे नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील पानभोसी गावातील एक अवलिया वनरक्षक असलेल्या शिवसांब घोडके या व्यक्तीची. ज्याने निसर्ग सेवा गटाची स्थापना करून दररोज एक रोप लागवड चळवळ सुरु केली. १ जानेवारी २०२२ रोजी सुरू झालेली या चळवळीने एका उजाड माळरानाचे चक्क नंदनवन केले असून एका छोट्या जंगलाची निर्मितीच केली आहे.

शिवसांब घोडके यांनी वृक्षारोपण आणि त्याच्या संवर्धनाचा जणू काही विडाच उचलला आहे. कंधार तालुक्यातील पानभोसी येथील माळावरील सिद्धेश्र्वर महादेव मंदिर परिसर रोप लागवड चळवळीचे ठिकाण झाले आहे. निसर्ग सेवा गटाने या माळावर एक जानेवारी २०२२ पासून रोप लागवडीला सुरुवात केली. दररोज कमीत कमी एका रोपाची लागवड येथे केली जाते. एक वर्ष नऊ महिने २४ दिवसापासून अविरतपणे हा उपक्रम राबविला जातो. आतापर्यंत येथे २५० प्रजातींच्या तीन हजाराच्यावर रोप लावून त्यांचे संवर्धन करण्यात आले असून रोप लागवडीमुळे मंदिर परिसर नंदनवन बनला आहे.सुरुवातीला वनरक्षक असलेल्या शिवसांब घोडके च्या वृक्षारोपण व संवर्धनाकडे लोकांनी लक्ष दिले नाही ,काहीतरी शासकीय कामे करत असेल असा गैरसमज लोकांचा झाला होता. परंतु तब्बल वर्षभरांनंतर लोकांना कळून चुकले कि या व्यक्तीने निःस्वार्थपणे हे कार्य सुरु केले आहे . लोकांचा सहभाग हळूहळू वाढत गेला आणि दररोज एक रोप लागवड हा या तालुक्यातील लोकांची आवड झाली .

रोप लावून मुलीच्या जन्माचे स्वागत तर वाढदिवस ,लग्न आणि स्मृतिदिनी रोप लागवड

पानभोसीसह परिसरातील चार ते पाच गावातील ग्रामस्थ रोप लागवडीला जीवनाचा अविभाज्य भाग समजतात. वाढदिवस, स्मृतिदिन, एखाद्या कार्याची सुरुवात रोप लागवडीतून केली जाते. नव विवाहित वधू – वर अक्षता पडताच रोप लागवडीसाठी माळावर येतात. परिसरात मुलीच्या जन्माला वरदान समजले जाते. कुणाच्याही घरी मुलीचा जन्म होवो, तिच्या नावे एक रोप लावून ते जगवण्याची प्रथा पानभोसी परिवारात वाढीस लागली आहे. केक कापून वाढदिवस साजरा करण्याऐवजी



रोप लावून वाढदिवस साजरे करण्याची परंपरा वाढीस लागली असून यामध्ये युवक–युवतींचा मोठा सहभाग दिसून येत आहे . पानभोसी येथील हा उपक्रम हा हळूहळू कंधार तालुक्याच्या इतर गावात हि पोहोचत आहे .

निसर्ग सेवा दररोज एक रोप लागवडीचा अखंडित ८९१ वा दिवस

निसर्ग सेवा गट पानभोसी यांनी सिद्धेश्र्वर महादेव मंदिर माळ परिसरात देशी, दुर्मिळ, व औषधी वनस्पतींची वनराई फुलवली आहे.

निसर्ग सेवा गटाने सिद्धेश्र्वर महादेव मंदिर माळ पानभोसी येथे दररोज एक रोप लागवड चळवळ सुरू करून ८९१ दिवस झाले असून या उजाड असलेल्या माळावर देशी, दुर्मिळ, औषधीवनस्पतीच्या सुमारे १५६ विविध प्रजाती

व सुमारे ३५०० पेक्षा जास्त रोपांची लागवड करण्यात आली आहे.याची सुरवात वनविभागातील वनरक्षक असलेल्या शिवसांब बाबुराव घोडके यांनी केली असुन त्यांना गावातील व परिसरातील लोकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळाला आहे.या दररोज एक रोप लागवड चळवळीत रोपे विविध कारणांनी केली जाते त्यात वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्न वाढदिवसाच्या निमित्ताने,नोकरी लागलेच्या निमित्ताने ,सेवानिवृत्ती च्या निमित्ताने, मुलगी जन्माला आलेवर, शुभप्रसंगी, प्रिय व्यक्तींच्या स्मृतीत, महान व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी निमित्ताने व इतर कारणांमुळे रोप लागवड करणे सुरू असल्यामुळे खऱ्या अर्थाने दररोज एक रोप लागवड चळवळ लोकांची चळवळ बनत चालली आहे.

निसर्ग सेवा गटामध्ये अनेक जन स्वंयप्रेरणेने सहभागी होउन निस्वार्थीपणे निसर्ग सेवा बजावत आहेत.या दररोज एक रोप लागवड चळवळीत रोप लागवड करण्यासाठी निवडताना पक्षांना वर्षेभर फळे उपलब्ध व्हावीत हा उद्देश डोळ्यासमोर ठेउन देशी, दुर्मिळ,फुलांच्या व औषधीवनस्पतीची लागवड करणे सुरू आहे.

**घोडके यांना दोन वेळा मिळाले सुवर्णपदक**

पानभोसी परिसरात रोप लागवडीला चळवळीचे स्वरूप देणाऱ्या वनरक्षक शिवसांव घोडके यांना वन व वनजीवन संरक्षण कार्यात उत्कृष्ट कार्य केल्याबदल २०१४ आणि २०१७–१८ साली महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सुवर्णपदक देऊन गौरवण्यात आले. पुढील वर्षात एक हजार रोप लागवडीचा मानस असल्याचे घोडके यांनी सांगितले. हे कार्य करत असल्याने एक मानसिक शांती मला लाभते असे ते म्हणाले आणि हि चळवळ सध्या काळाची गरज असल्याचे ते सांगतात. तसेच आयूष मंत्रालय भारत सरकारच्या मार्फत सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेसाठी घोडके यांना निमंत्रण मिळाले होते . तेथे त्यांनी औषधी वनस्पती बद्दल देशभरातील विक्रेते व खरेदीदार यांना मार्गदर्शन केले. तसेच येत्या काही दिवसात त्यांचे वनस्पती

**हे आहेत चळवळीचे सारथी**

शिवसांब घोडके यांच्या पुढाकारातून या चळवळीत अशोक पाटील, प्रा. बळवंत भोसीकर, शिवराज गोंड, मनोहर नाईकवाडे, संग्राम नरंगले, शंकर घोडके, कैलास घोडके, त्र्यंबक भोसीकर, श्यामसुंदर लुंगारे, शिवदास नाईकवाडे, बाबुराव भोसीकर, पंढरीनाथ भोसीकर, शिवाप्पा स्वामी, शिवकुमार घोडके, बसवेश्र्वर नाईकवाडे, चंद्रकांत नाईकवाडे, सखाराम घोडके, संभाजी नाईकवाडे, परमेश्र्वर वल्लमपल्ले, मोतीराम भोसीकर,दत्तात्रय एमेकर आदी निसर्ग सेवक कार्यरत आहेत.यासोबतच पानभोसी च्या निसर्ग सेवा गटाची हि चळवळ गावागावात पोहोचत असून अगदी माळरानावर झाडे जगवण्यासाठी नागरिकांकडून सयंस्फूर्तपणे मदत केली जात आहे हे विशेष.

**निसर्ग सेवा गटातर्फे ५० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका**

निसर्गसेवागटानेवृक्षलागवडी सोबतच लोकसहभागातून या ठिकाणी ५० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासीका सुरु केली आहे. या अभ्यासिकेत ५०० पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामुळे स्पर्धा परीक्षेची – तयारी करणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे.यामध्ये एक रोप लागवड केल्यानंतरचया अभ्यासिकेत एक महिन्यासाठी मोफत प्रवेश दिला जातो. या ठिकाणी पानभोसी ग्राम पंचायतीच्या वतीने सरपंच सौ. भाग्यश्री मनोहर भोसीकर यांनी युवकांसाठी व्यायाम शाळा उपलब्ध करून दिल्याने युवकांच्या बौद्धिक विकासासोबतच शारीरिक विकास होत आहे .

**निसर्ग सेवा गटाचा आदर्श घेण्याची गरज**

एकीकडे ग्लोबल वार्मिंग च्या चक्रव्यूहात सापडलेल्या संपूर्ण जगाला प्रचंड तापमानाचा त्रास होत असून . या पासून मुक्तता हवी असेल तर गाव – गावात निसर्ग सेवा गटाचे अनुकरण होणे गरजेचे आहे. वाढदिवस असो कि स्मृतिदिवस असो एक रोप लागवड करून आपली परंपरा कायम राखत भावी पिढीवर योग्य संस्कार कोरण्याचे कार्य या निसर्ग सेवा गटाकडून केले जात आहे.







यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. ०८ जून २०२४



कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

# उसाची पहिली उचल न देणाऱ्या कारखान्याची साखर जप्त करावी - दुधगावकर



धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर कारखान्यास गाळपासाठी दिला. मात्र आजपर्यंत त्या उसाची पहिली उचल शेतकऱ्यांना दिलेली नाही. त्यामुळे साखर कारखान्याची साखर जप्त करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे दि.७ जून रोजी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील कारखान्याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ऊस गाळपसाठी घातला होता. मात्र त्याची पहिली उचल अद्यापपर्यंत देण्यात आलेली नाही. याबाबत कारवाई करण्याची मागणी वारंवार केली. आजतागायत काहीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. साखर कारखाने बंद होऊन दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. एवढा कालावधी जाऊनही जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाची पहिली उचल अद्यापपर्यंत दिलेली नाही. त्यामुळे साखर कारखान्यांची साखर जप्त करुन शेतकऱ्यांचे उसाचे पहिले बील येत्या ४ दिवसांत देण्यासाठी आपण संबंधितांना आदेशीत करावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दुधगावकर यांनी दिला आहे.

# कत्तलीसाठी वासरांची वाहतूक करणाऱ्यांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या




धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – कतकत्तलीसाठी ४२ गोवंशीय वासरांना घेऊन जाणाऱ्या वाहन चालककास पोलिसांनी रंगेहात पकडून बेड्या ठोकल्या आहेत.



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अंबी पोलीस ठाण्याचे पोलीस पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन व नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करीत होते. या तपासणी दरम्यान दि.६ जून रोजी रात्री २ वाजण्याच्या सुमारास इनगोंदा रोडने एक अशोक लिलॅन्ड १४१५ छोटा दोस्त कंपनीचा बदामी रंगाचा टेम्पो क्र एमएच ४२ बी एफ आय १६६५ असा येत असताना पोलीस पथकास दिसला. पोलीस पथकाने त्या वाहनास हात करुन थांबवला. त्या अशोक लिलॅन्ड टॅम्पोची पथकाने पाहणी केली असता त्यामध्ये गोवंशीय जातीचे वासरे दिसून आले. त्या वाहन चालकास त्याचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे शारंख दस्तगीर शेख (वय २८ वर्षे) रा.भिगवन ता. इंदापूर जि. पुणे, सद्दाम ईक्बाल शेख (वय ३० वर्षे), रा. भिगवन ता. इंदापुर जि. पुणे अशी सागितली. नमूद अशोक लिलॅड टॅम्पोमध्ये गोवंशीय ४२ जिवंत वासरे व ८ मयत वासरांसह वाहन असा एकूण ६ लाख रुपये किंमतीची वासरे व वाहन मिळून आले. त्या गोवंशीय वासरांना वाहनांमध्ये दाटीवाटीने भरण्यात आले होते. या गोवंशीय वासरांना गाडीमध्ये हालचाल करण्यासाठी पर्याप्त जागा नव्हती. अत्यंत त्रासदायक पध्दतीने दाटीवाटीने भरुन अवैधरित्या कत्तल करण्यासाठी त्यांची वाहतूक करण्यात येत होती. त्यावरुन पथकाने नमुद आरोपी विरुध्द अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदणी क्रमांक ७१/२०२४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५ (अ) (१), ९ (ब), प्राण्याच्या निर्दयतेने वागविण्यात प्रतिबंध कायदा १९६० कलम ११ (१) (ड) (ई) (एच) कलम ६, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ सह मोटार वाहतूक कायदा कलम १९२ (अ) सह कलम ३४ भा. दं. वि. सं. अन्वये गुन्हा नोदंवला आहे. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशावरुन अंबी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक खरड, सपोफौ शेख, पोहेकॉ शेंडगे, पोहेकॉ भोसले, पोकॉ सोनटक्के, पोकॉ चौगुले, चापोकॉ डमाळे यांच्या पथकांनी केली आहे.

# वागदरी येथे दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




नळदुर्ग दि.७ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे इयत्ता १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रामपंचायत व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीच्यावतीने करण्यात आला.

मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी बोर्ड परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सरपंच तेजाबाई मिटकर, उपसरपंच सुरेखा यादव, ग्रामसेवक एम.एम. तांबोळी, ग्रा.प.सदस्या मिनाक्षी बिराजदार यांच्या हस्ते पुष्पहार, पुष्पगुच्छ व शालेय साहित्य देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यानी केले. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक तथा सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीचे अध्यक्ष तथा सेवा निवृत्त पोलिस हवालदार संदिपान वाघमारे, माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, जेष्ठ कार्यकर्ते मोहनसिंग (दादा) चव्हाण, नागनाथ जाधव, सुदामा वचणे,महादेव बिराजदार, रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रामसिंग परिहार,बाळु पवार, बाळकृष्ण बिराजदार,दत्ता पाटील, चरणसिंग परिहार, ग्रामपंचायत कर्मचारी ओंकार चव्हाण,सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाल मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी अतिसार पंधरवड्याला विशेष महत्त्व - डॉ. हरिदास

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – नवजात अर्भक आणि पाच वर्षाच्या आतील लहान मुलांच्या होणाऱ्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या कारणांपैकी अतिसार हे कारण आहे. तसेच अतिसारामुळे ५ ते ७ टक्के बालके मृत्यू पावतात. त्यामुळे बालकांचे होणारे मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी या पंधरवड्याला विशेष महत्त्व असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतीश हरिदास यांनी दि.६ जून रोजी सांगितले.



तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरिदास यांच्या हस्ते व जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. के.के. मिटकरी यांच्या उपस्थितीत विशेष अतिसार नियंत्रण पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला. दि.६ ते २१ जून या कालावधीत हा पंधरवाडा आरोग्य विभागाच्यावतीने आयोजित करण्यात येतो. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. के.के. मिटकरी, तुळजापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ किशोर घाडगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. यत्नाळकर, डॉ.सचिन गायकवाड आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ हरिदास म्हणाले की,

या पंधरवडा दरम्यान प्रत्येक घरोघरी भेटी देऊन आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांच्यामार्फत क्षार संजीवनी अर्थात ओआरएसचे द्रावण तयार करणे, त्याचे महत्त्व समजावून सांगणे, त्याचा वापर करणे तसेच अतिसार टाळण्यासाठी स्वच्छतेचे महत्त्व सांगावे. यामध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, परिसर स्वच्छता, जेवणापूर्वी, स्वयंपाक करण्यापूर्वी, बाळाला जेवण भरवण्यापूर्वी हाच साबणाने स्वच्छ धुणे या बाबीचा प्रचार प्रसार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय इत्यादी ठिकाणी क्षार संजीवनी अर्थात ओआरएस कॉर्नर तयार करण्यात आले असल्याचे देखील डॉ हरिदास यांनी सांगितले. तर जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ मिटकरी यांनी क्षार संजीवनी सोबतच झिंक गोळ्यांचे महत्त्व विषद करून बाळाचा अतिसारापासून बचाव करण्यासाठी पहिले ६ महिने निव्वळ स्तनपानाचे महत्व ल अ– जीवनसत्वाची पूरक मात्रा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सर्व आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका व अतिसार पंधरवड्याच्या केलेल्या नियोजनानुसार सर्व घरांना भेटी देऊन मोहीम यशस्विपणे पार पाडावे अशा सूचना त्यांनी दिल्या. तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ किशोर घाडगे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासह तालुक्यामध्ये ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कैं. महारुद्र बप्पा मोटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार

परंडा दि.७ (प्रतिनिधी) – येथील कैं. महारुद्र बप्पा मोटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थापक रणजीत मोटे यांच्या हस्ते दि.६ जून रोजी करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तालुकाध्यक्ष संदीप पाटील, ॲड सुभाष वेताळ, पंकज पाटील, युवक तालुकाध्यक्ष धनंजय पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ॲड सुजित देवकते, डॉ रवींद्र जगताप, सोमनाथ सिरसट, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, माजी जिप सदस्य मारुती मासाळ, अप्पा बनसोडे, माजी नगराध्यक्ष नसीरशहा बर्फीवाले, शहराध्यक्ष श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, सामाजिक न्याय जिल्हा सरचिटणीस घणश्याम शिंदे, गनीभाई हावरे, खयुम तुटके, सचिन पाटील, अमोल जगताप, रामभाऊ मुसळे, महेश खुळे, हनुमंत गायकवाड, तालुका युवक उपाध्यक्ष बंडू रगडे, सुधीर वाघमोडे, संकेत कांबळे, प्राचार्य हनुमंत यादव, सलीम शेख, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ नवनाथ वाघमोडे, पत्रकार सुरेश घाडगे, प्रा. सूचित सातपुते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद झोंबाडे यांनी तर आभार पटेल यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यादव सुधीर, प्रा. देशमाने, प्रा. मारकड महादेव, प्रा. अजय मेटकर, प्रा. अजित देशमुख, प्रा. रणजीत देशमुख, प्रा. खैरे, प्रा. मणियार, प्रा. वणवे, सुरवसे, सरडे, जागताप, इतापे, भोरे, हाके, सेवक राजाभाऊ बनसोडे, अशोक कोकणे, देविदास गरड, थोरबोले आदींनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घराघरात पोहोचले पाहिजे – अंहकारी

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्त्व नसून त्यांचा त्याग, रयतेची जबाबदारी व लाखोंनी घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्त्वाचे होते. ज्याप्रमाणे शिवजयंती चौकात साजरी केली जाते. त्याप्रमाणे प्रत्येकांच्या घराघरात हृदयाला साक्ष ठेवून छत्रपती शिवरायांचे विचार मांडले पाहिजे. छत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा प्रत्येक घरामध्ये केलेच पाहिजे. छत्रपती शिवरायांची जयंती साजरी करण्यापेक्षा छत्रपती शिवरायांच्या विचारांची जयंती साजरी करणे आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नळदुर्गचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी दि.६ जून रोजी केले.



नळदुर्ग येथे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष शरद बागल, माजी नगरसेवक संजय बताले, अमृत पुदाले, महालिंग स्वामी, बसवराज धरणे, विलास येडगे, शिवाजी नाईक, विकास सोसायटीचे चेअरमन संजय बेडगे, शिवसेनेचे सरदारसिंह ठाकूर, बलदेवसिंह ठाकूर भाजपाचे शहराध्यक्ष धिमाजी घुगे, विकास सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे, सुशांत भुमकर, समीर मोरे, भाजपचे तालुका सरचिटणीस श्रमिक पोतदार, भाजपा युवा मोर्चाचे सागर हजारे, भगवंत सुरवसे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, संजय जाधव, अमर भाळे, आंबाबाई मंदिर समितीचे अध्यक्ष रमेश जाधव, राजेंद्र महाबोले, नंदकुमार जोशी, शिवराम मोटे, प्रमोद जोशी, किशोर जोशी, अरुण जोशी, तानाजी नागणे, शिवाजी नागणे, अनिल गुरव, नारायण दोपारे, उमेश जाधव, संतोष जाधव, उमेश नाईक, सचिन भुमकर, राजकुमार वैद्य, अजित देशपांडे , प्रदीप ग्रामोपाध्याय, अमित भूमकर, संदीप वैद्य, ज्ञानेश्वर केसकर, रोहित वाले, अनिल पाटील, मारुती घोडके, अनिल कुलकर्णी, मयुर जोशी, सुहास पुराणिक, अनिल पाटील, मारुती घोडके, अनिल कुलकर्णी, मयूर जोशी, सुहास पुराणिक आदी उपस्थित होते.

# मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती समितीच्यावतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी चौकात दि.६ जून रोजी साजरा करण्यात आला .

प्रारंभी समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर फुलांच्या माळांनी व गुलाबांच्या पाकळ्यांनी सजवला होता. फटाक्यांची आतषबाजी व ढोल ताशांच्या दणदणाटाने चौक दणाणून गेला. तर यावेळी मिठाई वाटप करून शिवराज्याभिषेक सोहळ्याचा आनंद साजरा केला. यावेळी मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, माजी




अध्यक्ष आशिष मोदाणी, अग्निवेश शिंदे, उमेश राजेनिंबाळकर, धनंजय राऊत, अनंत जगताप, बालाजी तांबे, सिद्धार्थ बनसोडे, भालचंद्र कोकाटे, शहाजी भोसले, कुणाल निंबाळकर, मुकुंद घाडगे, राजेश बंडगर, आदित्य शिंदे, शिवराज कापसे, अविनाश जाधव, ज्ञानेश्वर पंडित, शितल देशमुख, जयपाल शेरखाने, नानासाहेब बोराडे, चंद्रकांत इंगळे, खंडू राऊत, किशोर राऊत, सौरभ गायकवाड, प्रमोद कोराळे, चंद्रकांत इंगळे, सुरज जिंतपुरे, महेश उपासे, रुद्र भुतेकर, ओंकार बांगर आदीसह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## अपेक्षित कौल

२०१४ मध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यापासून आतापर्यंत नरेंद्र मोदी यांनी ६० हून अधिक वेळा ईशान्य भारताचे दौरे केले. काँग्रेसने ईशान्य भारताकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजप सातत्याने करत राहिला.

अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला. सिक्कीममध्ये सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाने (एसकेएम) विधानसभेच्या ३२ पैकी ३१ जागांवर यश मिळवून विक्रम केला. संपूर्ण देशाचे लक्ष लोकसभा निवडणुकीच्या निकालाकडे लागलेले असताना ईशान्येतील या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. सिक्कीममध्ये भाजपचे सर्व बारा आमदार पराभूत झाले. मात्र, भाजपला तेथे मिळालेल्या मतांची टक्केवारी वाढली. सिक्कीममध्ये २०१९ मध्ये भाजपला १.६२ टक्के मते मिळाली होती, ही टक्केवारी आता ५.१८ पर्यंत पोहोचली आहे. शिवाय एकतर्फी विजय मिळविणारे एसकेएम'चे नेते आणि मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांनी आपण भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीबरोबर असल्याचे म्हटले आहे. शतप्रतिशत भाजप' हे अलीकडच्या काळात भाजपचे धोरण. अर्थात, ईशान्येकडील राज्यांमध्ये मजबूत अस्तित्व निर्माण करण्यासाठी भाजपने पावले टाकली. २०१६ मध्ये भाजपला आसाममध्ये विजय मिळाल्यावर भाजपच्या ईशान्य मोहिमे'ला वेग आला. भाजपने ईशान्येतील अन्य राज्यांमध्ये सत्ता मिळवली; पण पूर्वाश्रमीच्या काँग्रेस नेत्यांची मदत घेऊन! याचाच अर्थ शत प्रतिशत' हे तांत्रिकदृष्ट्याच खरे, असे म्हणावे लागेल.

आयात नेते

आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिश्व सरमा, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक सहा, मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग हे सर्व जण भाजपने आयात केलेले नेते! मेघालय, नागालँडमध्ये स्थानिक पक्षांच्या मदतीने भाजप सत्तेत आहे. चीनव्याप्त तिबेटला लागून अरुणाचलची सीमा असल्याने संरक्षण सिद्धतेच्या दृष्टीनेही हे राज्य महत्त्वाचे आहे. या राज्यात भाजप सलग तिसऱ्यांदा सत्तेत येत आहे. मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ६० जागांपैकी ४६ जागा जिंकल्या. यातील दहा जागांवर भाजपला बिनविरोध विजय मिळाला. त्यात पेमा खांडू यांचाही समावेश आहे. दहा जागांवर भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले. त्याचवेळी भाजपची सत्ता पुन्हा येणार हे पुरेसे स्पष्ट झाले होते. काँग्रेसला अवघी एक जागा मिळाली आहे. मणिपूरमधील हिंसाचार हा संपूर्ण देशभर चिंतेचा विषय ठरला. ईशान्येकडील राज्यांमध्ये विरोधकांना त्या मुद्द्याचा प्रभावी वापर करता आला नाही असे दिसते. पेमा खांडू यांचे वडील दोरजी खांडू हे देखील अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री होते. २०१६ मध्ये पेमा खांडू यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २०१९ मध्ये दणदणीत विजय मिळवून त्यांनी सत्ता कायम राखली. आता तिसऱ्यांदा ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. सत्ता कशी राखायची याचे दांडगे कौशल्य पेमा खांडू यांच्याकडे आहे. त्यामुळे भाजपमध्ये त्यांची उपयुक्तता वाढत गेली. आसाममध्ये भाजपचा उदय झाल्यावर खांडू यांनी राजकीय दिशा बदलली. त्यांनी पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचल प्रदेश' या नावाचा पक्ष स्थापन केला आणि काँग्रेसच्या सर्व ४३ आमदारांसह संपूर्ण विधिमंडळ काँग्रेस पक्षच या नव्या पक्षात विलीन करून टाकला होता. नव्या पक्षातील सत्तासंघर्षानंतर ते भाजपच्या गोटात दाखल झाले. सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग शासकीय निधी अपहार प्रकरणात दोन वर्षांची शिक्षा भोगून आलेले आहेत. मागील पाच वर्षे त्यांच्या कारभारावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले; मात्र मतदारांनी पुन्हा एकदा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखविला आहे. गेली पाच वर्षे ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक होते. जागा वाटपावरून बिनसल्याने ते स्वतंत्र लढले. सिक्कीमच्या मावळत्या विधानसभेत भाजपचे बारा सदस्य होते. सिक्कीम हे डोंगराळ राज्य. घटनेच्या ३७१ व्या कलमाद्वारे या राज्याला विशेष अधिकार आहेत. भाजप सत्तेवर आल्यास जम्मू-काश्मीरप्रमाणे ते अधिकार रद्द होतील, हा प्रचार भाजपला भोवला. सिक्कीम डेमोक्रॅटिक पक्षाचे पवनकुमार चामलिंग दोन जागांवर उभे होते. दोन्ही ठिकाणी ते पराभूत झाले. अरुणाचलमध्ये भाजपने विजयी पताका फडकावली असली तरी सिक्कीमचा निकाल पक्षाला आत्मचिंतन करायला लावणारा आहे.

# चाबहार वरून अमेरिका का संतापली?



आधी चाबहार बंदर प्रकल्पाला पाठिंबा देणाऱ्या अमेरिकेचे पित्त आता का खवळले, त्या वरून भारताला इशारा देण्यापर्यंत अमेरिकेची मजल का गेली, गेल्या वर्षभरात चीन आणि इराणचे संबंध सुधारले असताना अमेरिका का नाराज होत नाही, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यावी लागतील. तरच चाबहार बंदराचे महत्त्व आणि अमेरिकेची नाराजी ओढवूनही भारत या करारावर ठाम का आहे, हे समजू शकेल.चीनने चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपीईसी)अंतर्गत पाकिस्तानमध्ये ग्वादर बंदर विकसित करण्याचा निर्णय घेतला. हा प्रकल्प जवळपास ४५ अब्ज डॉलरचा आहे. सामरिकदृष्ट्या भारताला शह देण्यासाठी या प्रकल्पाचा वापर होणार आहे. मात्र चीन आणि पाकिस्तानदरम्यान करार होण्याआधीच भारताने इराणशी चाबहार बंदर विकसित करण्यासंबंधी चर्चा केली होती.

अफगाणिस्तान, इराण, रशिया किंवा तिकडच्या अन्य देशांशी व्यापार करायचा झाला तर मध्ये पाकिस्तान आहे. या पार्श्वभूमीवर अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इराणबरोबर चर्चा झाली. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना करार झाला; परंतु मध्यंतरीच्या काळात इराणवर अमेरिकेसह जगाने निर्बंध घातले होते. त्यामुळे हा करार पुढे जाऊ शकला नाही. चाबहार बंदर झाले तर भारत आणि इराणमधील अंतर मुंबई-दिल्ली अंतरापेक्षा कमी होईल, पश्चिम आशियातील व्यापार वाढेल तसेच सामरिकदृष्ट्या या बंदराच्या माध्यमातून चीन आणि पाकिस्तानला शहही देता येईल. आता इराणवर अमेरिकेचे असले तरी जगाचे निर्बंध नाहीत.

दोन्ही देशांमधील संबंधित मंत्र्यांच्या उपस्थितीत इंडिया पोर्टस् ग्लोबल लिमिटेड' (आयपीजीएल) ही भारतातील सार्वजनिक कंपनी आणि इराणची पोर्ट आणि मेरिटाइम ऑर्गनायझेशन' यांच्यात हा करार झाला. त्यानुसार भारतीय कंपनी चाबहार बंदराच्या आधुनिकीकरणात सहभागी होईल. बेहेश्ती पोर्ट चाबहारच्या विकासासाठी पुढील दहा वर्षांमध्ये अंदाजे ३%० दशलक्ष डॉलर खर्च करेल. त्याचे व्यवस्थापन आणि संचालनदेखील करेल. या रकमेपैकी सुमारे १२० दशलक्ष डॉलर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवले जातील तर उर्वरित २५० दशलक्ष डॉलर इराणला कर्ज म्हणून दिले जातील.

चाबहार बंदर विकसित करण्याचा भारताचा हेतू अनेक दशके जुना आहे. हे बंदर इराणच्या दक्षिण-पूर्व किनाऱ्यावर असून तिथून दक्षिण अफगाणिस्तानचा संपूर्ण प्रांत अफगाणिस्तान-इराण सीमेवर असणाऱ्या झारंज शहरात उघडतो. या बाबी लक्षात घेऊन २००२ मध्ये वाजपेयी सरकारने दूरदृष्टीने अफगाणिस्तानला झारंज ते दिलाराम हा रस्ता तयार करण्यासाठी मदत केली होती. हा रस्ता चाबहार ते अफगाणिस्तान आणि अफगाणिस्तानमार्गे मध्य आशिया, पुढे रशिया आणि युरोपीय देशांना जाण्याचा मार्ग खुला करतो. पाकिस्तान निर्यातीसाठी पंजाब, खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तानमार्गे अफगाणिस्तानचा मार्ग कधीही उघडणार नाही. पाकिस्तान आणि चीन यांचाही अफगाणिस्तानला चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरशी जोडण्याचा मानस आहे. त्याचा दुवा ग्वादरमार्गे असेल.

अशा परिस्थितीत चाबहार बंदराचा विकास आर्थिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून स्वाभाविकपणे आपल्या हिताचा आहे.

असे असतानाचाबहार करारानंतर अमेरिकेने भारताला इशारा दिला. इराणला सहकार्य करणाऱ्यांनी अमेरिकेने त्या देशावर लादलेल्या निर्बंधांची आठवण ठेवावी, असे सूचित करणारा हा गर्भित इशारा आहे. २०१६ मध्ये भारत आणि इराण यांच्यामध्ये अमेरिकी निर्बंधांना न जुमानता चाबहार बंदराचा करार झाला होता. त्या वेळी अमेरिकेने जाहीर केले होते की चाबहारच्या विकासासाठी भारताचे सहकार्य निर्बंधांच्या कक्षेबाहेर राहील. भारत आणि अमेरिकेची मैत्री आहे तसेच आशियात चीनला शह देण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज आहे. असे असले तरी आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण आहे. आपण अन्य देशांशी कसे आणि किती संबंध ठेवावेत, या विषयात अमेरिकेने लुडबूड करण्याचे काहीच कारण नाही. भारताने रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र घेतली, तेव्हाही अमेरिकेने परिणामांचा इशारा दिला होताच. निर्बंध असतानाही भारतासह जगातील अनेक देशांनी रशियातून खनिज तेल खरेदी केले आहेच. अमेरिकेच्या प्रवक्त्यांच्या वक्तव्यात कठोरपणा नसल्यामुळे कदाचित भारत आणि अमेरिकेदरम्यान या मुद्यावर पडद्याआड चर्चा झाली असण्याचीही शक्यता आहे. देशांतर्गत दबावामुळे आणि या वर्षी पार पडत असणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीमुळे अमेरिकेने हे विधान केले असण्याचीही शक्यता आहे. अध्यक्ष जो बायडेन प्रशासनाने इराणबाबत अतिशय कठोर भूमिका घेतली आहे. इराण हा पश्चिम आशियातील मोठा देश आहे. इराणचे भारतासोबतचे राजकीय संबंध, विशेषत: ऊर्जा क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरले आहेत. तथापि, हेदेखील सत्य आहे की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे अनेक भारतीय कंपन्यांनी इराणपासून अंतर राखले होते. कंपन्यांनी तिथे गुंतवणूक करणे टाळलेले होतेच पण इराणी कंपन्यांशी भागीदारी करण्यासदेखील कंपन्या नाखूश होत्या. असे केल्याने अमेरिकन कंपन्यांशी असणारे संबंध किंवा अमेरिकेतील त्यांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकण्याची भीती त्यांना वाटत होती.केंद्र सरकारनेही इराणशी संबंध जपताना अमेरिकेच्या निर्बंधांचा विचार केला आहे. यामागील कारण म्हणजे भारताचे सर्वांगीण हित इराणपेक्षा अमेरिकेशी जास्त जोडलेले आहे. तरीही याचा अर्थ इराण आणि भारताने आपले संबंध पुढे नेऊ नयेत, असा होत नाही.

या कराराला अंतिम स्वरूप दिल्यानंतर अमेरिकेपासून चीन तसेच पाकिस्तानपर्यंत विविध देश चिंतेत पडले आहेत. मूलत: चाबहार हा बलुची वाक्प्रचार चाहर बहार'चे छोटे रूप आहे. यामध्ये चाहर म्हणजे चार आणि बहार म्हणजे वसंत. या शब्दाचा अर्थ समजून घेतला तर वर्षातील चारही ऋतू वसंत ऋतूसारखे असणारा भाग म्हणजे चाबहार. परदेशातील एखाद्या बंदराचे व्यवस्थापन भारताकडे घेण्याची ही पहिलीच वेळ आहे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे चाबहार बंदर इराणच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवर सिस्तान-बलुचिस्तान प्रांतात आहे. या स्थानामुळेच ते भारतासाठी खूप खास आहे. पाकिस्तानच्या ग्वादर बंदरापासून ते केवळ ७२ किलोमीटर अंतरावर आहे. चाबहार हा इंटरनॅशनल नॉर्थ-साउथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर' (आयएनएसटीसी) चा एक भाग आहे. हा एक बहु-मॉडेल वाहतूक प्रकल्प आहे. हा प्रकल्प हिंद महासागर आणि पर्शियन आखाताला रशियातील सेंट पीट्सबर्ग मार्गे इराण आणि उत्तर युरोपला कॅस्पियन समुद्राशी जोडतो. चीन आणि पाकिस्तान अस्वस्थ असण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. चाबहार करार म्हणजे पाकिस्तानच्या ग्वादर बंदर आणि चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'ला भारताने दिलेले उत्तर म्हणूनच याकडे पाहिले जात आहे.

भारत गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या महत्त्वाकांक्षी नेक्स्टल ऑफ डायमंड' प्रकल्पावर काम करत आहे. चीनला सर्व बाजूंनी घेरणे हा या रणनीतीचा उद्देश आहे. या रणनीतीअंतर्गत भारत आपल्या नौदल तळांचा विस्तार करत असून चीनच्या रणनीतींना तोंड देण्यासाठी सामरिकदृष्ट्या मजबूत देशांशी संबंध सुधारत आहे. भारताच्या या रणनीतीमध्येही चाबहार हा अत्यंत महत्त्वाचा थांबा आहे. खेरीज चाबहार कॉरिडॉरअंतर्गत भारत, इराण, अफगाणिस्तान, आर्मेनिया, अझरबैजान, रशिया, मध्य आशिया आणि युरोपमधील मालाची वाहतूक करण्यासाठी जहाज, रेल्वे आणि रस्त्यांचे %,२०० किलोमीटर लांबीचे जाळे तयार केले जाणार आहे. या मार्गामुळे भारताचा युरोपमध्ये प्रवेश सोपा होणार आहे. अशा अनेक अर्थांनी हा करार महत्त्वाचा आहे.-प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

# विकास दर चौथ्या तिमाहीमध्ये घसरणार




देशाच्या विकासदरा(जीडीपी)चे अधिकृत आकडे जाहीर होण्यास अजून काही दिवस शिल्लक असताना अनेक एजन्सींनी भारताच्या चौथ्या तिमाहीतील विकासदराचा अंदाज लावणे सुरू केले आहे. इंडिया रेटिंग'नंतर आता इक्रा'ने अंदाज जाहीर केला आहे. इक्रा'च्या अंदाजानुसार भारताचा चौथ्या तिमाहीचा डेटा एका वर्षातील सर्वांत कमी पातळीवर असू शकतो. तो मोठा धक्का असेल.

भारताचा विकास दर सलग तीन तिमाहींमध्ये आठ टक्क्यांच्या वर राहिला होता. आता इक्रा'ने काढलेला चौथ्या तिमाहीचा अंदाज सात टक्क्यांपेक्षा कमी आहे. इक्रा'ने २०२३-२४ च्या जानेवारी-मार्च तिमाहीमध्ये भारताचा सकल देशांतर्गत उत्पादनवाढीचा दर ६.७ टक्क्यांच्या चार तिमाहींमधील नीचांकी पातळीवर येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. इक्रा'चा अंदाज आहे की, २०२३-२४ साठी विकासदर वाढ ७.८ टक्के असेल. इक्रा'च्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ अदिती नायर यांनी सांगितले की, काही औद्योगिक क्षेत्रांच्या नफ्यात घसरण, कमी व्हॉल्यूमवाढ, तसेच कमॉडिटी किमतींमधून कमी नफा यामुळे आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत घसरण होईल. २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या जानेवारी-मार्च तिमाहीमध्ये भारताचा विकासदर ६.१ टक्क्यांनी वाढला. संपूर्ण २०२२-२३ साठी ही वाढ सात टक्के होती. २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीमध्ये विकासदर आणि सकल मूल्यवर्धित (जीव्हीए) वाढ शंभर बेसिस पॉइंट्सने कमी होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, इंडिया रेटिंग'नेही चौथ्या तिमाहीसाठी असाच अंदाज व्यक्त केला होता. इंडिया रेटिंग्स अँड रिसर्च'च्या आकडेवारीनुसार मार्च तिमाहीमध्ये भारताची विकासदर वाढ ६.७ टक्के असू शकते.

संपूर्ण आर्थिक वर्षाचा विकासदर वाढीचा आकडा ६.९ ते ७ टक्क्यांपर्यंत असू शकतो. इंडिया रेटिंग्ज'नुसार सरकारला गेल्या तिमाहीत जीएसटी संकलनाचा खूप फायदा झाला; मात्र गेल्या तिमाहीमध्ये हे संकलन वाढीसाठी आवश्यक तेवढे दिसले नाही. दुसरीकडे, भारतीय रिझर्व बँकेने एप्रिलमध्ये झालेल्या पतधोरण बैठकीत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा अंदाजही काही विशेष नाही. रिझर्व बँकेने संपूर्ण आर्थिक वर्षात देशाचा विकास दर सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता.

# उपदेशकथा:स्वभाव

समानशिले व्यवनेषु सख्यम हे सुभाषित आपण वारंवार ऐकतो आणि त्याचे प्रत्यंतर समाजात वावरताना आपणाला पदोपदी येतेही. याच सुभाषिताचा दाखला देणारी ही कथा. एका साध्या संवादातून आपणास बोध मिळेल. एकदा प्रचंड महापूर आल्याने नदीच्या पात्रातून दोन भांडी वाहत होती. त्यापैकी एक भांडे होते पितळेचे तर दुसरे भांडे होते मातीचे. त्या पुरातून वाहत जातानाच त्यांच्यातून संवाद चालला होता. पितळेचे भांडे मातीच्या भांड्याला म्हणत होते, मित्रा, तू इतक्या दुरुन का चालला आहेस? माझ्याजवळ ये. आपण दोघे हातात हात घालून जाऊ. कशी मजा येईल. मला तुला डोळे भरून पाहता येईल आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या या पाण्यापासून तुझे रक्षणही करता येईल. मातीच्या भांड्याने पितळेच्या भांड्याचे आभार मानले आणि ते म्हणाले, कृपा करून कोणत्याही परिस्थितीत तू माझ्याजवळ येऊ नकोस. तुझीच मला सर्वात जास्त भीती आहे. तुझा थोडासा जरी धक्का मला लागला तरी माझ्या ठिकऱ्या उडतील. तुझा-माझा स्वभावच भिन्न आहे.

कथा उपदेश : भिन्न स्वभावांचे, छंदांचे लोक एकत्र कसे येणार?

## गुदगुल्या

**नकार होकार**


**अजय :** तू जर मला नकार दिलास तर जगातील कोणत्याच मुलीवर मी प्रेम करणार नाही.

**काजोल :** आणि समजा मी होकार दिला तर ?






# राशी भविष्य



०८ जून २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

वृषभ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर
सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल. चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

मिथुन : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम
व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

कर्क : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण
प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शयता आहे.

कया : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर
प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

तुळ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

वृश्चिक : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

धनु : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पश्चिम
जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

मकर: शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर
न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

कुंभ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

मीन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

०५ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सर्वस्वी बुधाचा प्रभाव आहे. एखादी गोष्ट आपल्या बुध्दीला पटल्याखेरीज तुम्ही तिचा स्वीकार करीत नाही. तुमची तल्लख बुध्दी अनेक विषयात स्वैर संचार करते. त्यामुळे कधी कधी बऱ्याच विषयांची माहिती पण प्रभुत्वाच्या बाबतीत उणेपणा होण्याची संभवना असते. तुमचे विचार कल्पना स्पष्ट असतात व ते इतरांपर्यंत पोचवण्याचे भाषाप्रभुत्वही तुमच्याकडे असते. शरीरसुखाच्या मागे धावण्यापेक्षा काव्यशास्त्र, विनोदात बोध्दिक आनंद घेणे तुम्हाला रूचते. बुध्दीइतकेच जीवनात भावनेलाही महत्व आहे याची नोंद घ्या. इतरांच्या भावनांशी समरस होण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याशी वैचारिक व भावनिक सुसंवाद साधू शकाल. अति बौध्दिक श्रम टाळायला हवेत. सतत एकाच प्रकारच्या स्थितीत बसून काम केल्यास मज्जातंतूची, पाठीची दुखणी उद्भवतील.

कार्यक्षेत्र : आकडेशास्त्र व शब्दयोजना यांच्यावर तुमचे सारखेच प्रभुत्व असल्याने जिथे या कौशल्याला वाव मिळेल असे सर्वच व्यवसाय तुमच्या गुणांचे चीज करतील. हिशोब तपासनीस, कर सल्लागार म्हणून नोकरी वा स्वतंत्र व्यवसाय करू शकाल. पुस्तक लेखन, प्रकाशन, मुद्रण किंवा वर्तमान पत्रातील पत्रकारिता यात आपला ठसा उमटवू शकाल. बँका, वित्तीय महामंडळ, वाहतूक, टेलिफोन, दूरसंचार ही क्षेत्रेही अनुकूल ठरतील.

प्रणयी जीवन : आपला जोडीदार एक किमान बौध्दिक पातळीचा असावा अशी तुमची अपेक्षा असते. त्याचे वाचन, व्यासंग, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता याला तुम्ही महत्व देता. सहजगत्या भावनावश होणाऱ्या व्यक्ती तुम्हाला आवडत नाहीत शरीरसुखाचा पाठलाग करणाऱ्या व्यक्तीही नकोशा असतात. या दृष्टीने मे २१ ते जून २० दरम्यानच्या व्यक्तींचीच निवड करा.

वर्षफळ : भागीदारीतील व्यवसायात जास्त पैसा गुंतवू नका. नोकरीनिमित्ताने आप्तजनांपासून दूर राहावे लागेल. जानेवारी फेबुवारी मये नव्या करारातून अर्थिक प्राप्ती उंचावेल. मार्च एप्रिल मध्ये कार्यालयात खंबीर धोरणांचा अवलंब करा. मे जून मध्ये प्रशिक्षणासाठी, उसन्या सेवेसाठी निवड होऊ शकेल. जुलै ऑगस्ट मध्ये घराच्या सजावट, फर्निचर खरेदीसाठी खर्च कराल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये पगारवाढ, भत्याची मागणी मंजूर होईल.

महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७.

भाग्यरत्न : पाचू

याच तारेखेची व्यक्ती :
ना. म. जोशी, अंबर रॉय

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# भारताने द्वेष, भ्रष्टाचार, टायटॅनिकचं उदाहरण देऊन स्वरा भास्करने भाजपाला लगावला टोला, म्हणाली

## अयोध्येतील भाजपाच्या पराभवावरूनही स्वरा भास्करची खोचक पोस्ट



गेल्या काही दिवसांपासून देशभरात लोकसभा २०२४च्या निवडणुकीसाठी सात टप्प्यात मतदान झाले. आज मतमोजणी सुरू असून वेगळं चित्र पाहायला मिळत आहे. भाजपाप्रणित एनडीए आणि विरोधी पक्षांची इंडिया आघाडीमध्ये चुरस दिसत आहे. भाजपाने केलेले दावे फोल ठरत आहेत. त्यामुळे सध्या विरोधी पक्षातील नेतेमंडळी भाजपाला टोला लगावत आहेत. बॉलीवूड अभिनेत्री स्वरा भास्करने देखील सोशल मीडियाद्वारे भाजपाला सणसणीत टोला लगावला आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ निकाल

भाजपाने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ४०० पार जागा जिंकणार असल्याच्या घो-षणा केल्या होत्या. तसंच काही जणांनी भाजपा ३०० हून अधिक जागा जिंकणार असल्याचा अंदाज वर्तवला होता. पण संपूर्ण चित्र पालटलं आहे. भाजपाप्रणित एनडीए आणि इंडिया आघाडीमध्ये चुरस सुरू आहे. सध्या एनडीए २९३ जागांनी आघाडीवर असून इंडिया आघाडी २३२ जागा जिंकल्या आहेत. अनेक ठिकाणी भाजपाला विजयासाठी खूप संघर्ष करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवरून स्वरा भास्करने एक्स'वर पोस्ट शेअर केली आहे.

अभिनेत्री स्वराने भाजपाला टोला लगावत लिहिलं आहे, ते म्हणतात ना, टायटॅनिक बुडण्यासारखे नव्हते पण मग एक दिवस आला आणि ते बुडाले. सरकार कोणाचंही स्थापन झालं तरी आज भारताने द्वेष, भ्रष्टाचार, लोभ आणि अहंकाराचा पराभव केला आहे.

तसंच तिनं आणखी एक पोस्ट केली आहे. उत्तर प्रदेशच्या फैजाबाद मतदारसंघातील निकालावरून स्वराने ही पोस्ट केली आहे. अयोध्या शहर हे फैजाबाद मतदारसंघात मोडते. त्यामुळे तिनं लिहिलं आहे, श्रीरामाचं नाव बदनाम करणाऱ्यांना, त्यांच्या नावावरून पाप करणाऱ्यांना जय श्रीराम.

दरम्यान, भाजपाला जिथे जिंकण्याची अधिक अपेक्षा होती त्याचं उत्तर प्रदेशात मोठा फटका बसला आहे. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाचे ३७ आमदार आघाडीवर आहेत. तर भाजपा ३३ ठिकाणी आघाडीवर आहे.

## गाढवाचं लग्नफ्मधील गंगी काळाच्या पडद्याआड, लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचं निधन

'गाढवाचं लग्न' वगनाट्य गाजवणाऱ्या प्रभा शिवणेकर यांची प्राणज्योत मालवली.

लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचं निधन झालं आहे. ८१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गाढवाचं लग्न' या वगनाट्यात त्यांनी गंगीची भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी लोकप्रिय असलेल्या प्रभा शिवणेकर यांचं अल्पशा आजाराने निधन झालं.गाढवाचं लग्न' हे हरिभाऊ वडगावकर यांनी लिहिलेलं प्रसिद्ध वगनाट्य आहे. या नाटकाला भारतीय केंद्रशासनाचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. वगनाट्यात प्रभा शिवणेकर गंगीची भूमिका करायच्या. 'गाढवाचं लग्न'चे प्रयोग राज्यभरात झाले होते. या प्रयोगांसाठी दादू इंदुरीकरांचं जेवढं कौतुक व्हायचं तितकंच कौतुक व प्रसिद्धी प्रभा शिवणेकर यांना मिळाली. या



भूमिकेसाठी प्रभा शिवणेकर यांना भारत सरकारच्या संगीत नाट्य अकादमीनं १९७४ साली तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव केला होता. प्रभा शिवणेकर या उत्तम अभिनय करायच्या. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक नाटकांमध्ये काम केलं. मात्र त्यांना ओळख गाढवाचं लग्न' या वगनाट्यातून मिळाली. अनेक वर्षे त्यांनी या वगनाट्यात गंगी ही भूमिका साकारुन प्रेक्षकांची मनं जिंकली. आपल्या कारकिर्दीत १०० हून अधिक भूमिका साकारणाऱ्या प्रभा शिवणेकर नाटकांच्या प्रयोगानिमित्त राज्यभर फिरायच्या. गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे प्रयोग तर राज्यातील अनेक खेड्यांमध्येही झाले होते. सोशल मीडियावरर प्रभा शिवणेकर यांना लोक श्रद्धांजली वाहत आहेत.आई-वडील झोपल्यावर मध्यरात्री त्यांच्या खोलीत जायची जान्हवी कपूर, कारण सांगत म्हणाली

प्रभा शिवणेकर या अविवाहित होत्या. त्यांच्या निधना-ने कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. प्रभा शिवणेकर आपल्या बहीण व भावांबरोबर राहायच्या. त्यांच्या भावंडांनीच त्यांचा शेवटपर्यंत सांभाळ केला. प्रभा शिवणेकर यांच्यावर मुळशी तालुक्यात त्यांच्या मूळ गावी शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ज्येष्ठ सुरू होतोय



चैत्र, वैशाखात भाजून निघाल्यानंतर ज्येष्ठाची आस न वाटली तरच नवल! ज्येष्ठ केवळ पाऊसच घेऊन येत नाही, तर करपलेल्या स्वप्नांवर आशेची पेरणी करत येतो. या काळात बरसणाऱ्या सरींमध्ये रिते कुंभ भरवून टाकण्याची शक्ती आहे. दोन-चार जोरदार सरीही निसर्गातील शुष्कता हटवू शकतात, असा पाण्याच्या एका-एका थेंबासाठी सुरू असणारी निसर्गाची आराधना संपवणारा ज्येष्ठ सुरू होतोय. त्याचे सहर्ष स्वागत करू या.

ज्येष्ठ येतोय. इंग्रजी वर्षाचा जवळपास निम्मा काळ संपल्यानंतर येणारा हा तिसरा मराठी मास. एक ऋतू संपून दुसऱ्याच्या प्रारंभीचा काळ. सर्जनाचे नवे पर्व सुरू होण्याचा हा काळ. अशा वेगवेगळ्या अर्थाने ज्येष्ठाचे महत्त्व जाणवते. ज्येष्ठ हा शुष्कता आणि ओलावा यांच्यामधला दुवा आहे. हा निरभ्रता आणि भारलेपणा यांची सांधेजुळणी करणारा काळ आहे. म्हटले तर फटफटीत उजेडापासून कडुसं आलेल्या काळापर्यंतचा तो लहानसा प्रवास आहे; पण तोच सर्जनशील असल्यामुळे अत्यंत मोहक आणि रमणीय आहे. चैत्र आणि वैशाख तापतो. निसर्ग एखाद्या भट्टीसारखा रसरसतो. सध्याच्या ग्लोबल वॉर्मिंगच्या युगात तर ही धग असह्य होतीये. आधीच सिमेंट कॉंक्रिटने वेढलेल्या जंगलात कसाबसा तग टिकून राहणारा निसर्ग या धगीत अगदी होरपळून जातो. तो उद्रेक सजीवसृष्टीलाही त्रासदायक ठरतो. नदी-नालेच नव्हे; तर जणू जीवनप्रवाहालाच ओढ बसते. असे असताना त्या आ' वासून पडलेल्या जमिनीबरोबरच प्रत्येकाला पावसाची ओढ लागते. कधी एकदा ही रखरख संपते आणि थंडगार हवेचा झोत स्पर्श अंगाला करुन जातो, असे होऊन जाते. कारण वाढता ताप थेट जगण्याच्या इच्छेला, ऊर्मीला, चेतनेला दाह देतो. म्हणूनच ज्येष्ठामध्ये आभाळात काळी किनार दिसू लागते आणि पावसाचे टपोरे थेंब शपण करू लागतात, तेव्हा निसर्गाबरोबरच प्रत्येक जीवातली जीवनेच्छाही सुखावते.

सर्जनाचा हा सांगावा आगामी समृद्धीचे पदरव ऐकवून जातो. बहुप्रतीक्षेनंतर वेगवान वाऱ्यांमुळे हलणारी सृष्टी एखाद्या देखण्या नर्तकीसारखी भासू लागते. वृक्षलतांचे तेथे डौलदार हदोळणे तनामनाला मोहीत करून जाते. या तालात चैत्रामध्ये फुटलेली पालवी आणखी उजळून निघते, अधिक टवटवीत होते. म्हणूनच ज्येष्ठ देखणा आणि संपन्न वाटतो. अशा भारलेल्या वातावरणात मध्येच लख्खकन प्रकाशमान होणारी शलाका नाचून जाऊ लागते. अशातच छाती दडपून टाकणारा तो नगारा घुमू लागतो आणि सरसर जमिनीवर उतरणारे टपोरे थेंब जमिनीच्या रोमारोमात सामावू लागतात.

भन्नाट वाऱ्याच्या झोतात सैरावैरा उडणारा पाचोळा या दृश्याला वेगळीच नाट्यमयता देतो आणि ज्येष्ठ अवतरल्याची खात्री पटते. असा हा ज्येष्ठ अग्नीकुंभाकडून जलकुंभाकडे नेणारा स्वप्नांची साखरपेरणी करणारा, बहरत्या आशावेलींना आधार देणारा

ज्येष्ठ अशा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. जीवनशैलीमध्ये सुंदर बदल घडवून आणणारा आहे. वळवाची झडाझडी संपल्यानंतर मान्सून वाऱ्यांचा सुंदरसा गोफ विणणारा आहे. समुद्राला उधाण आणणारा आहे. आटलेले झरे, ओढे-नाले प्रवाहित करणारा आहे. म्हणूनच जीवसृष्टीच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अद्वितीय आहे. हे महत्त्व अधोरेखित करण्यासाठीच ज्येष्ठात निसर्गासमीप नेणाऱ्या सणांचे प्रयोजन असते. वटपौर्णिमा हा त्यातलाच एक सण. वडासारख्या फलदायी वृक्षाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी पौराणिक कथांचे, आख्यायिकांचे कोंदण या सणाला धार्मिक मूल्य देऊन जात असले, तरी मुळात वृक्षसंवर्धन हाच यामागील मूळ हेतू आहे, हे आता अनेक जण जाणतात. त्यामुळे या सर्जनपर्वात आता निसर्गरक्षणाचे, वनीकरणाचे अनेक उपक्रम हाती घेतले जातात. विविध स्वयंसेवी, पर्यावरणप्रेमी संस्था या कामी पुढाकार घेतात. विद्यार्थी, कॉर्पोरेट क्षेत्र, ज्येष्ठांच्या संघटना वनीकरणाच्या या कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद देतात. हाती सीड बॉल, हिरवीगार रोपं, विविध प्रकारच्या बियांनी भरलेल्या पिशव्या घेऊन निघालेली निसर्गरक्षकांची ही उमदी फळी बघितली की, वाढत्या असंतुलनाची काळजी काही अंशी तरी कमी होते आणि आपणही किमान एक झाड लावावे, वाढवावे ही भावना जन्म घेते. ज्येष्ठात पार पडणारे वृक्षारोपणाचे कार्यक्रम समाजमनाला प्रोत्साहित करणारे ठरतात.

याचा सर्वात मोठा आणि फलदायी ठरणारा प्रयोग वारीच्या निमित्ताने अलीकडच्या काळात आपण पाहत आहोत. भक्तांना घेऊन निघालेली ही विशाल सरिता विठ्ठलरूपी सागराच्या दिशेने जायला निघते, ती याच महिन्यात. ज्येष्ठात अनेक संतांच्या पालख्या पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. पूर्वी हा केवळ भक्तीचा महापूर असायचा. मात्र आता त्यात अनेक जाणिवांचे प्रवाहही मिसळत आहेत. उदाहरणार्थ, पावसाळ्यात पार पडणारी ही वारी स्वच्छता, निसर्गरक्षण, संवर्धन आणि वनीकरणाचा संदेश अतिशय सक्षमतेने सर्वदूर पसरवत आहे. हजारोंच्या संख्येने वारी करणाऱ्या शेतकऱ्यांकडे बिया देऊन, त्यांच्यामार्फत त्या वारीच्या मार्गातल्या उजाड माळरानांवर पसरवणे आणि त्यायोगे हिरवाई वाढवण्याचा स्तुत्य प्रयत्नही जोरकसपणे राबवला जाताना दिसत आहे. मुख्य म्हणजे त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. हा बदल निश्चितच दखलपात्र आहे.


ज्येष्ठाचा महिना हा पावसाची नव्हाळी अनुभवण्याचा काळ आहे. पावसाची रिपरिप, संततधार सुरू होण्यापूर्वीचा हा काळ एक वेगळीच वातावरणनिर्मिती करतो. या काळात जमिनीतला कोरडेपणा इतका टोकाचा असतो की, ती पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे आचमन करत असते. सहाजिकच पाणथळ साठतेय, डबकी भरलेली आहेत, त्यावर डास, माशा घोंघावत आ-हेत, कुंद हवेमुळे रोगजंतू पसरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे, असे कोणतेही चित्र या काळात दिसत नाही. म्हणून पर्यटकांसाठीही हा सुवर्णकाळच असतो. एखाद-दुसरी जोरदार सर येऊन गेली की, निसर्ग हिरवाईसाठी कवाडे पूर्णपणे उघडतो. मग जादू घडावी, त्याप्रमाणे चार-दोन पावस-ातच धुळीत हरवलेल्या पायवाटा हिरव्या होतात. ओल्या मातीचा सुगंध वेडावून टाकू लागतो. वाहत्या वाऱ्यामध्ये असणारा पाण्याचा अंश हवाहवासा गारवा देऊन जातो. अशा या वाता-वरणात आतापर्यंत कृत्रिम गारव्याचा झोत झेलून वैतागलेले शरीर आणि मन स्वच्छंदी पाखराप्रमाणे बाहेर पडू पाहते. कारण केवळ हा सगळा बदल बघून समाधान होत नाही, तर तो अनुभवण्यासाठी, रंध्रारंध्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी जणू निसर्गच आपल्याला साद घालत असतो.

बदलत्या निसर्गाला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाकडी वाट करून लोकांचे जत्थे हिरवाईमध्ये दडलेल्या अनवट वाटा पालथ्या घालत आहेत. धरणक्षेत्रांवर गर्दीचा महापूर बघायला मिळत आहे. अलीकडच्या काळात पाऊसकाळात दिसणारे हे परिचित चित्र आहे. हा ज्येष्ठाचा नव्याने परिचय करून घेण्याचा प्रयत्न आहे, असेही आपण म्हणू शकतो. पूर्वी शेतात राबताना, पायी प्रवासात गाव-जंगले ओलांडताना सहज अनुभवता येण्याजोगा हा बदल निरखण्यासाठी आता खास नियोजन करावे लागते, इतकेच. त्यात चुकीचे काहीही नाही. मात्र निसर्गाचे हे बदलते रुप अनुभवताना सजगता बाळगायला हवी. हे मात्र नक्की. ही बेशिस्त गर्दी निसर्गहानीचे मुख्य कारण ठरत असल्याचे समोर येत असताना, आता तरी आपण नियमांचे पालन करण्याची गरज ओळखायला हवी.

ज्येष्ठातले हे दिवस जलभरणाचे आहेत. रिती झालेली पात्रे भरताना एखाद्या गृहिणीला किती प्रयास घ्यावे लागतात! इथे तर जमिनीवरचा आणि जमिनीखालचा असे दोन्ही जलस्तर पूर्णपणे आटलेले असताना, पडणारा प्रत्येक थेंब किती महत्त्वपूर्ण असतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळेच तो साठवण्याचा आणि मुरवण्याचा प्रयत्न अगदी व्यक्तिगत पातळीपासून व्हायला हवा. उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारे आक्रंदन थांबवायचे असेल, तर आधी आपण निसर्गावरचे अतिक्रमण थांबवणे गरजेचे आहे, हे आता तरी जाणून घ्यायला हवे.

सोसायट्यांमध्ये, घरांमध्ये पावसाचे पाणी साठवायचे अनेक पर्याय सध्या उपलब्ध आ-हेत. त्याची माहिती घेणे आणि शक्य तशी अंमलबजावणी करणे हे आता प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. हा वसा घेतला, तर येणारा काळ सुख आणि सौख्य दाखवून देईल, अशी स्वप्ने आपण पाहू शकतो. शेवटी उंची महालांमध्ये राहण्याची स्वप्ने असली, तरी ती पावसाच्या पाण्यावरच पोसतात. ज्येष्ठातला हा पाऊस त्या दृष्टीने साठवायला हवा. त्याचा प्रवाह आपणच केलेल्या अवाढव्य कचऱ्यात, अतिक्रमणांच्या विळख्यात अडकणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. अमृताचे प्रतिरुप असणारे हे पाणी शक्य तितके शुद्ध ठेवणे,- हे तुम्हा-आम्हा प्रत्येकाचेच कर्तव्य आहे.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्ल्वीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.म सलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# सौर ऊर्जेवर भर दिल्याने महावितरण आव्हानांसाठी सज्ज:श्री.लोकेश चंद्र



लातूर / प्रतिनिधी- महावितरणकडून शेतीसाठी सौर ऊर्जेचा देशात सर्वाधिक वापर करण्यात येणार असून यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज पुरवठा मिळणार असून औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांवरील सबसिडीचा बोजा कमी होईल. स्वस्त सौर ऊर्जेमुळे वीज खरेदीच्या खर्चात मोठी बचत होऊन सर्वच वीज ग्राहकांचे वीज दर मर्यादित राखण्यात मदत होईल. सौर ऊर्जेचा वापर महावितरण साठी क्रांतिकारी ठरणार असून त्याच्या वापरामुळे भविष्यातील आव्हानांचा यशस्वीपणे मुकाबला करण्यासाठी महावितरण पूर्णपणे सज्ज आहे, अशी खात्री महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी दिली.

## महावितरणचा १९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

महावितरण कंपनीचा १९ वा वर्धापन दिन महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.लोकेश चंद्र बोलत होते. कार्यक्रमाला म.रा.वि.म.सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, महावितरणचे संचालक (संचालन) श्री अरविंद भादिकर हे प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून कृषी पंपांच्या सौर उर्जीकरणाला मोठी गती देण्यात येत आहे. औद्योगिक ग्राहकांसाठी स्वागत कक्ष, ग्राहकांना २४ तासांत वीज जोडणी, ग्राहक सेवेसाठी ऑनलाईनचा जास्तीत-जास्त वापर, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर यामुळे ग्राहक सेवेत महावितरणने आपला दर्जा उंचावला आहे. ग्राहक समाधानासाठी हा दर्जा कायम राखावा असे आवाहन श्री. लोकेश चंद्र यांनी यावेळी केले.

पारेषण विरहित सौर कृषी पंप योजना अंतर्गत ८.५ लक्ष कृषीपंप शेतकऱ्यांना मिळणार असून भविष्यात वीज जोडणी साठी प्रकरणे प्रलंबित राहणार नाही.यासाठी मिशन मोड वर काम करण्याची गरज आहे. मप्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजलीफ योजनेमुळे ग्राहकांना ३०० युनिट पर्यंत मोफत वीज उपलब्ध होईल. परिणामी अशा वर्गवारीतील ग्राहकांच्या सबसिडीचा बोजा कमी झाल्याने महावितरणला त्याचा फायदा होईल. याही योजनेच्या वापरासाठी कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना प्रोत्साहित करावे, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

महावितरणचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक म्हणाले की, राज्यातील सुमारे ३ कोटी ग्राहकांना वीज पुरवठा करणारी महावितरण ही देशातील सर्वोत्तम वीज वितरण कंपनी आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा तर करताच येईल त्याशिवाय महावितरणच्या सर्वच ग्राहकांना याचा दिलासा मिळणार आहे. तसेच आरडीएसएस योजनेमुळे वीज यंत्रणेचे सक्षमीकरण होऊन महावितरणला भविष्यात विजेची वाढती मागणी पूर्णकरणे शक्य होणार आहे.यंत्रणेचे सक्षमीकरण करताना स्पर्धेच्या युगात ग्राहक सेवेचा दर्जा नेहमी सर्वात्कृष्ट ठेवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महावितरणचे संचालक श्री. अरविंद भादिकर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, महावितरणने नेहमीच विविध योजनांच्या प्रभावी अमंलबजावणीतून देशात कायम अव्वल स्थान राखले आहे. यापूर्वी भारनियमन, वीज तुटवडा सारख्या वेगवेळ्या आव्हानांवर महावितरणने यशस्वी मात केली आहे. वर्ष २०३० साठी नियोजन करताना कंपनीची आर्थिक स्थिरता चांगली असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यादृष्टीने सौर ऊर्जेचा जास्तीत-जास्त वापर, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वसुलीवर परीणामकारक तोडगा, वीज यंत्रणेचे सक्षमीकरण व वीज हानी रोखण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी ही सर्व कामे करण्यात येत आहे. कंपनीची प्रगती अशीच कायम ठेवायची असेल तर ग्राहकांना केंद्रबिंदू मानून आपल्या सेवांचा दर्जा कायम राखला पाहिजे व त्यासाठी सर्वांनीच कटिबद्ध राहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. कार्यक्रमात महावितरणच्या मयत कर्मचाऱ्यांच्या वारसाच्या मार्गदर्शनाकरिता मानव संसाधन विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी सायबर गुन्हे तज्ञ् श्री.संदीप गादिया यांचे विशेष व्याख्यान झाले. कार्यक्रमाला महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली निमजे यांनी केले तर आभारदर्शन कंपनी सचिव अंजली गुडेकर यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे : डॉ. संदीपान जगदाळे

लातूर / प्रतिनिधी- नुकतेच दहावी व बारावीच्या निकाल लागले आहेत. या काळात विद्यार्थी आपल्या करिअरच्या वाटा शोधीत असतात. अशा स्थितीत विद्यार्थीच काय तर पालकही गोंधलेले असतात. त्यांना करिअरच्या योग्य वाटा सापडाव्यात यासाठी धाराशिव आकाशवाणी केंद्रावरून दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील प्रयोगशील प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. ज्या विषयात आवड आहे, अभिरुची आहे, ज्यातून आपल्याला समाधान मिळेल, काम करताना कार्यानंद मिळेल व ज्या क्षेत्रात गोडी आहे त्याच ज्ञानशाखेची निवड करून विद्यार्थ्यांनी भविष्यातील करिअरची निवड करावी.

केवळ गुणपत्रिकेवर आलेली गुणांची सूज म्हणजे गुणवत्ता नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ आपल्याला मिळालेल्या गुणांनुसार एखादी ज्ञानशाखा निवडू नये. योग्य करिअर निवडण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा परंतु एकदा करिअर निश्चित झाल्यानंतर त्यातून माघार न घेता आत्मविश्वासाने व परिश्रमाने त्या करिअरमध्ये समर्पित भावनेने कार्य करावे. अनेक वेळा आपले मित्र मैत्रिणी ज्या ज्ञान शाखा निवडतात त्याच ज्ञान शाखा काहीजण निवडतात. परंतु असे करू नका कारण प्रत्येक व्यक्ती ही अद्वितीय असते. त्यामुळे आपला कल पाहूनच करिअर निवडावे.

पालकांनी सुद्धा आपल्या अपेक्षांचे ओझे आपल्या पाल्यावर लादू नये. आपल्या पाल्याची क्षमता, त्याच्याकडील असलेली कौशल्ये, त्याची बुद्धिमत्ता म्हणजे आय क्यू, सोशल कोषण म्हणजे एस. क्यू. व इमोशनल कोशन म्हणजे इ.क्यू. याचा विचार करून आपल्या पाल्याच्या करिअर निवडण्यासाठी मदत करावी. कोणतीच ज्ञान शाखा ही कनिष्ठ किंवा वरिष्ठ असत नाही. विद्यार्थी त्यामध्ये किती कौशल्य पणाला लावतील त्यावरून त्या करिअरचे श्रेष्ठत्व ठरत असते. केवळ अर्थ प्राप्तीसाठी करिअर निवडू नका तर त्या करिअरला तुम्हाला काय देता येईल का? या काही विचार करा.

करिअरमधील अडथळे व त्याचे निवारण कसे करावे? विविध ज्ञान शाखा, त्यातील असलेले विषय व त्यातून कोणकोणत्या करिअरच्या संधी आहेत या विविध विषयांवर डॉ. जगदाळे यांनी विद्यार्थी व पालकांची संवाद साधला. हा




कार्यक्रम आज दिनांक ८ जून २०२४ रोजी सायंकाळी ६:३० वाजता धाराशिव आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित होणार आहे. याचा अधिकाधिक विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. जगदाळे यांनी केले आहे.

डॉ. जगदाळे यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, शालेय समितीचे अध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य अनिलकुमार माळी व पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी अभिनंदन केले आहे.

# साथरोग प्रतिबंधासाठी मनपाच्या उपाययोजना नागरिकांनीही दक्षता घेण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : पावसाळ्याच्या कालावधीत शहरात साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.नागरिकांनीही कोरडा दिवस पाळणे व इतर उपायांच्या माध्यमातून सहकार्य करण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पावसाळ्यात डेंग्यू व इतर कीटकजन्य आजारांची साथ वाढण्याचा धोका असतो. डेंग्यू हा आजार डासांपासून होतो.त्यामुळे डेंग्यु प्रतिबंधासाठी नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस मकोरडा दिवसफ पाळण्याचे आवाहन लातूर मनपाच्या आरोग्य विभागाने केले आहे.

मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात लातूर मनपाच्या आरोग्य विभागाच्यावतीने जून महिन्यात डेंग्यू प्रतिबंधक अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.या अंतर्गत आठवड्यातून एक दिवस पाण्याचा साठा असलेली सर्व भांडी रिकामी करावीत,ती भांडी घासून- पुसून कोरडी करावीत आणि घरातील सर्व पाणीसाठे झाकून ठेवण्याचे आवाहन केले जाते.यामुळे डासांचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होते, अशी माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.शंकर भारती यांनी दिली.

दरवर्षी जून-जुलै महिन्यात पाऊस कधी कमी तर कधी जास्त प्रमाणात पडतो.यामुळे डासांना पोषक वातावरण तयार होते.परिणामी डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होते.डास आणि पावसाळ्यातील दूषित पाण्यामुळे कीटकजन्य व जलजन्य आजार उद्भवतात.या जलजन्य आणि कीटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी आपले घर आणि परिसरातील सर्व पाणीसाठे रिकामे करणे, कोरडा दिवस पाळणे, पिण्याच्या पाण्याचे साठे झाकून ठेवणे,कीटक प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी करणे आदी उपाययोजना करणे गरजेचे असते.डेंग्यू या आजाराचे प्रसार करणारे डास हे घरातील मनिप्लांट, फ्रिज, कुलर, जमिनीतील पाण्याची टाकी, प्लास्टिकच्या टाक्या, घराच्या परिसरात पडून असलेले आणि वापरात नसलेले टायर,प्लास्टिक कुंड्या, प्लास्टिकच्या वस्तूमध्ये साठलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालत असतात.याला आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाच्या जोडीला लोकसहभाग महत्त्वाचा असतो. आगामी पावसळ्यात साथरोग उद्भवू नयेत यासाठी नागरिकांनी डासांपासून संरक्षणासाठी झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा.घर,घराच्या परिसरात नारळाच्या कवट्या,टायरमध्ये पाणी साचू देऊ नये.डासांना घरात येण्यापासून रोखण्यासाठी घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात.घराच्या परिसरातील अडगळीचे साहित्य नष्ट करावे.घर व परिसर स्वच्छ ठेवावा.ताप येताच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा त्वरित सल्ला घेऊन औषधोपचार सुरु करावेत.ताप अंगावर न काढता उपचार घ्यावे.

पुर्ण अंगभर (हात पाय पुर्णपणे झाकले जातील असे ) कपडे वापरावेत. घरात किंवा कार्यालयात डांसापासून संरक्षणासाठी खिडक्या व दरवाज्यांना जाळ्या बसवाव्यात.मच्छर रोधक उपाययोजनांचा वापर करावा.

उपाययोजना करुनही आजाराची लक्षणे दिसल्यास आरोग्य तपासणी व उपचाराची आवश्यकता असल्यास महानगरपालिका अंतर्गत कार्यरत शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातून वैद्यकीय सल्ला व उपचार घ्यावा,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. पावसाळ्यात शहरातील कोणत्याही भागात साथीचे रोग उद्भवणार नाहीत याची दक्षता आरोग्य विभागाच्यावतीने आतापासूनच घेण्यात येत आहे.यासाठी शहरातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता नियमितपणे केली जाणार आहे.पाण्याचे शुद्धीकरण करणे,सांडपाण्याची विल्हेवाट लावणे, धूरफवारणी करणे आदी उपाययोजना करण्यात येत आहेत.याकामी नागरिकांनी सहकार्य करावे,असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

# शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात वित्तीय साक्षरतेची जनजागृती

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) - रिजर्व बैंक ऑफ इंडियाच्या ग्राहक शिक्षण विभागाच्यावतीने दि.३१ मे रोजी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात वित्तीय साक्षरतेची जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रथमतः पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून धन्वंतरी पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.एस. गंगासागरे यांच्या हस्ते मुंबई येथील आरबीआय अधिकारी आकाश काबरा, जाधव, अक्षय तुंगा, तांबोळी, राणे, एस.बी.आय रिजनल हेड दास व त्यांचे सहकारी,ऍक्सिस बैंक धाराशिव प्रमुख हिरोळे आदी उपस्थित होते.

आकाश काबरा यांनी दैनंदिन जीवनात होणारे फायनान्शियल फ्रॉड व त्यावरील उपाय याबाबत सविस्तर माहिती दिली. तर अक्षय तुंगा यांनी सादरीकरणाद्वारे सर्व फिशिंग लिंक्स, फेक कॉल्स,फेक ऍप्स, सिम कार्ड, फेक लोन ऍप्स, फेक लोन वेवसाईड, ओटीपी बेस्ड फ्रॉड अशा विविध ऑनलाईन फ्रॉडबद्दल उपयुक्त माहिती दिली. तसेच

एस.बी.आय. आणि ऍक्सिस बैंक अधिकाऱ्यांनी बँकेच्यावतीने होणारे सहकार्य व उपलब्ध सुविधा याबाबत सविस्तर माहिती दिली. ऑनलाईन फ्रॉडपासून सावध कसे रहायचे ? याबद्दल संपूर्ण माहिती असलेल्या तीन उपयुक्त पुस्तिका, मोबाईल स्टैंड, किचैन (विथ बारकोड) यांचे कार्यक्रमातील सहभागी व्यक्तींना मुंबई येथील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्यावतीने मोफत देण्यात आली. तसेच

आर्थिक फसवणूकीचे बळी हे अधिक प्रमाणात उच्चशिक्षित डॉक्टर्स असल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यासाठी असा काही फ्रॉड झाला असल्यास त्याची तक्रार १४४४८ या टोल फ्री नंबरवर करता येईल व त्याची तक्रार इमेलद्वारे करता येईल असे सांगितले. कार्यक्रमाची सांगता अधिष्ठाता प्रा. डॉ.श्री.गंगावणे यांनी वरील विषयाची दैनंदिन जीवनामधील उपयुक्तता समजावून सांगितली.तसेच यासंदर्भात जागरूक आणि सतर्क राहण्याबाबत सांगितले. या कार्यक्रमात सर्व अध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी, इंटनर्स विद्यार्थी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाला ३०० जणांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार डॉ.मयुर देशमुख यांनी मानले.

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि

दि.३०/०५/२०२४

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार केंद्रे धोंडीराम दिगांबर वय ४५ वर्ष रा. एकुर्का खु ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलाच्या नामे केंद्रे रामकृष्ण धोंडीराम यांचा जन्म मौजे एकुर्का खु ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक १०/०८/२०१० रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील केंद्रे रामकृष्ण धोंडीराम यांचा जन्म दिनांक १०/०८/२०१० रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी केंद्रे रामकृष्ण धोंडीराम यांचा जन्म दिनांक १०/०८/२०१० रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू केंद्रे रामकृष्ण धोंडीराम यांचा जन्म दिनांक-१०/०८/२०१० रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय एकुर्का खु ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०५/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख ३०/०६/२०२४

**- तालुका दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार जळकोट**

### टि.सी.हरवली आहे

माझी वैष्णवी किरण आपटे या नावाची १२ वी पासची मुळ टि.सी. व मार्क मेमो दि.३/०५/२०२४ रोजी उदगीर ते नांदेड प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा
मो.न.७०३८५५६५०८

### टि.सी.हरवली आहे

माझी स्वामी कांचन सदाशिव या नावाची १२ वी पासची मुळ टि.सी. व मार्क मेमो दि.३/०५/२०२४ रोजी उदगीर ते लातूर प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा
मो.न.८६६८८५४६२६

# समृद्धी महामार्गावर पुन्हा भीषण अपघात सीआरपीएफच्या दोन जवानांचा मृत्यू

यवतमाळ ७ - बीड येथील निवडणूक बंदोबस्त आटपून गडचिरोलीकडे जाणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलातील (सीआरपीएफ) जवानांच्या वाहनाला भरधाव ट्रकने पाठीमागून धडक दिली. ही धक्कादायक घटना धामणगावजवळील समृद्धी महामार्गावर गुरूवारी दुपारी घडली. या अपघातात एक जवान जागीच तर दुसऱ्या जवानाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गिरीष कुमार (४२, रा. केरळ) आणि मिठा तेजश्वरराव (३६, रा. आंध्रप्रदेश) अशी मृत जवानांची नावे आहेत. तर अब्दुल रफ असे जखमी जवानाचे नाव आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, लोकसभा निवडणूक मतमोजणी बंदोबस्तासाठी सीआरपीएफचे जवान बीड येथे आले होते. बंदोबस्त आटोपल्यानंतर जवानांचे वाहन बीड येथून गडचिरोलीकडे निघाले होते. अश्यात गुरूवारी दुपारी धामणगावजवळील समृध्दी महामार्गावर भरधाव ट्रकने सीआरपीएफ जवानांच्या वाहनाला मागच्या बाजूने धडक दिली. या धडकेत मिठा तेजश्वरराव या जवानाचा जागीच मृत्यू झाला, तर गिरीष कुमार आणि अब्दुल रफ गंभीर जखमी झाले होते. दरम्यान रूग्णवाहिकेच्या मदतीने जखमी जणांना यवतमाळ येथील शासकीय रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. सायंकाळी गंभीर जखमीमधील गिरीष कुमार या जवानाचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर अब्दुल रफ यांच्यावर उपचार सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी रूग्णालयात भेट देवून जखमी जवानांची चौकशी केली. शवविच्छेदनानंतर मृत जवानांचे शव नागपूर विमानतळावरून त्यांच्या मूळ गावी पाठविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी दिली.


या अपघातातील जखमींना यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आल्यानंतर प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत जवानांना तत्काळ उपचार करण्यासाठी तत्परता दाखवली. स्वत: जिल्हाधिकारी रुग्णालयात पोहचले. त्यांनी जखमी जवानांची आस्थेने चौकशी केली. या जवानांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या. मृत जवानांचे मृतदेह त्यांच्या मुळ गावी पाठविण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पवन बनसोड यांनी यंत्रणेस कामी लावले. गडचिरोली सीआरपीएफशी समन्वय साधून परिस्थिती हाताळली.

दरम्यान, समृध्दी महामार्गावर दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढल्याने या महामार्गावर जागोजागी अपघात नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी होत आहे.




उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
| --- | --- |
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत

शनिवार दि. ८ जून २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९१८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
| --- | --- | --- |
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# श्री स्वामी समर्थ पादुका पालकी चे उदगीरात भव्य स्वागत






उदगीर (प्रतिनिधी) श्री स्वामी समर्थ पादुका पालकीचे उदगीर शहरात भव्य स्वागत झाले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट यांच्यावतीने प्रतिवर्षी संपूर्ण महाराष्ट्रभर श्री स्वामी समर्थांची पालखी पादुका परिक्रमा शुक्रवार दि. ०७ जुन २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उदगीर शहरात आगमन होऊन माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या निवासस्थानी श्री स्वामी समर्थ महाराजांची महाआरती श्रीमती शांताबाई निटुरे, माजी नराध्यक्ष राजेश्वर निटुरे, शोभाताई निटुरे ,रामेश्वर निटुरे व सौ.सविता निटुरे, डॉ. शिवलिंग सोनटक्के ,अजय निटुरे,सौ.अंबिका निटुरे, विजय निटुरे,आकाश सोनटक्के, प्रतिक निटुरे ,गंगाधर निटुरे,प्रभूदेव निटुरे,संग्राम मळगे,चंद्रकांत मूचळंबे,बस्वराज नीटुरे,देवांश निटुरे, विहान निटुरे, यांच्या हस्ते संपन्न झाली.

बाजार समितीचे माजी उपसभापती रामराव बिरादार मामा, सुभाष धनूरे, सुभाष नागठाणे, संतोष तोडकर ,ज्ञानेश्वर बिरादार,पप्पू पांढरे, गणेश गायकवाड डॉ.रमण रेड्डी, डॉ. चंदावार

श्री स्वामी समर्थांच्या पादुका आयोजन पालखी परिक्रमाचे करण्यात आले असुन श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा महाराज संजय कुलकर्णी, महाराष्ट्र संयोजक संतोष भोसले, सिध्दराम कल्याणी व श्रीकांत झिपरे यांच्या नियोजनातून संपन्न होत आहे. आज शनिवार दि. ०८ जुन २०२४ रोजी सकाळी संतोष तोडकर यांच्या निवासस्थानी स्वामी भक्तांना दर्शन घेतल्यानंतर देवणीकडे प्रस्थान करणार आहे.

# शिवाजी महाविद्यालय वाढवणा येथे मुक्त विद्यापिठाच्या परीक्षा संपन्न



वाढवणा- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या बी. ए.प्रथम,द्वितीय,तृतीय अभ्यासक्रम पदवीच्या वार्षिक लेखी परीक्षा महात्मा फुले महाविद्यालय मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, शिवाजी कॅम्पस वाढवणा येथे संपन्न झाल्या असून ३६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे .

परीक्षा केंद्र सुरळीत पार पडण्यासाठी वरिष्ठ बहिस्थ परीक्षक डॉ.पद्माकर गोणे ,केंद्रप्रमुख प्रा. रामदास केदार, केंद्रसंयोजक प्रा.अनिल मगर यांनी काम पाहिले. परीक्षा काळात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाकडून डाँ. भास्कर माने, डॉ. निळकंठ पाटील, डॉ.गंगणे सर, डॉ. माळहिप्परगेकर, संस्थापक सचिव चंदन पाटील ,प्राचार्य मुंजेवार वाय. के. यांनी भेट दिली. परीक्षा सुरळीत पार पडल्या बद्दल समाधान व्यक्त केले. परीक्षा यशस्वीरित्या पार पडण्यासाठी संगणक विभाग प्रा. इंद्राळे एम.एम., सहाय्यक प्रा. मुळे एम.ए., पर्यवेक्षक प्रा.मुधाळे डी.जी.,प्रा. पठाण आर.एस.,प्रा. सौ.दहिफळे एस.पी.,प्रा. केंद्रे व्ही.जी., सौ. हाळणे एस.एस.,आदींनी काम पाहिले.

## सुलोचना देवी माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

उरगीर (प्रतिनीधी) येथील कै. बापुसाहेब पाटील एकवेकर शिक्षण संस्था अर्तगत सुलोचनादेवी माध्यामिक विद्यालयाचा निकाल १००% निकाल लागला आहे. या उज्वल यशाबदल कै. सचिव डॉ. विजयकुमार (पाटील, पुरसाहेब एकवेकर मंडळाचे अध्यक्षा सौ.लता पाटिल, कोषाध्यक्षा मृदूला पाटील व विद्यालयाच्या प्रशासन प्रमुख प्राजक्ता पटिल व शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर पाटील व शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जयवंतराव पाटील मित्र मंडळाच्या वतीने सत्कार

उदगीर :- उदगीर ते आयोध्या सायकलींग राईड यशस्वीरीत्या पूर्ण करणा-या उदगीर सायकलिंग क्लबच्या सायकल स्वारांचा सत्कार उदगीर येथील जयवंतराव पाटील मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. भर उन्हाळ्यात १३५० किलोमीटरचा सायकलींचा प्रवास करून आयोध्या गाठणाऱ्या सायकल पटूंचा अभिनंदन पर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयवंतराव पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योगपती जयवंतराव पाटील हे होते. यावेळी प्रसिद्ध सायकलपटू व हाफ आयरमॅन विवेक होळसंबरे ,प्रा.बालाजी महाळंकर,प्रा. संजीव कुमार माने, विष्णू तेलंग व प्रविण होळसंबरे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



सायकलच्या प्रचार प्रसारासाठी सायकल चलाव, पर्यावरण बचाव हा नारा घेऊन, त्यांनी सायकलचे महत्त्व सांगत उदगीर ते आयोध्या हा प्रवास भर उन्हाळ्यात पुर्ण केला. यावेळी सत्काराला उत्तर देताना विवेक होळसंबरे म्हणाले की, सायकलही तशी आजच्या काळात अडगळीत पडलेले वाहन झाले आहे.याच्या वापराने चार प चा फायदा होतो १ पैसा २ पेट्रोल ३ प्रदुषण ४ परकिय चलनाची बचत करून तुम्ही राष्ट्रीय कार्यात योगदान देवू शकता त्यासाठी आठवड्यातून एक दिवस सायकलिंग करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योगपती जयवंतराव पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी गटशिक्षणाधिकारी के.आर.शिंदे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक नेते माधवराव फावडे यांनी केले तर सुत्रसंचलन माणिकराव शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी कमांडर सुभाष बिरादार यांनी मानले. यावेळी अमृत नराचे, जनकराव जिवणे,माधव कबाडे, रामलिंग झुंगास्वामी, राजकुमार सज्जनशेटे , अजय अंबेसंगे, गजानन बिरादार, सुनील इंगोले, सलीम उंटवाले, कचरूलाल मुंदडा, रमेश कोरे, प्राचार्य राजकुमार नावंदर, रवींद्र बिरादार , अमोल तलवाडकर, पत्रकार भेंडेगावकर व मित्र मंडळाचे असंख्य सदस्य उपस्थित होते.

# क्रांती विद्यालयाने राखली यशाची परंपरा; निकाल १०० टक्के

जळकोट : प्रतिनिधी-एस. एस. सी. परिक्षेत क्रांती माध्यमिक विधालय केकतसिदंगी या शाळेतील विद्यार्थानी दैदीप्यमान यश संपादन केलेले असुन सलग शंभर टक्के निकाल लावण्याची परंपरा शाळेनी कायम राखली आहे.

शाळेतुन प्रथम क्रमांक मानशी मारोती गोंड या विधार्थीनीने अतिशय जिद्दीने कष्टातुन शिक्षण घेऊन ९३.४० टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे, तर मंगनाळे साईनाथ राजीव याने ९१.८० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तर तृतीय क्रमांक दळवे राजनंदनी ज्ञानोबा व गायकवाड संघर्ष लक्ष्मण या विधार्थाने समान ८८.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला आहे

या शाळेच्या विद्यार्थाने यशाची परंपरा कायम राखल्याबद्दल यशस्वी विधार्थांचे अभिनंदन संस्थेचे सचिव राजीव पाटील, विठ्ठल चंदावार,,विश्र्वनाथ इद्रांळे,जयवंत कांबळे तसेच मुख्याधापक विलास सिदंगीकर, कैलास पाटील गोंड, अंकुश सिदंगीकर, अरुण काळे, अभंग फड, देविदास मरशिवणे, जगन्नाथ दळवे, रमेश केंद्रे, केशव दळवे व पालकानी अभिनंदन व सत्कार केला आहे.

# बेशिस्तीत थांबणाऱ्या गाड्यांमुळे हाळी-हंडरगुळीत चक्का जॅम



हंडरगुळी (प्रतिनिधी)- येथून गेलेल्या नांदेड-बिदर अंतर राज्य मार्गालगत बेशिस्तीत थांबत असलेल्या २ व ४ चाकी वाहनांमुळे या मार्गावर सतत चक्का जॅम होऊन वाहतूक सेवा विस्कळीत होते.तसेच बेशिस्तीत थांबणा-या गाड्यांमुळे अन्य वाहनांसह पायी ये-जा करणारे लोकांना जीव मुठीत घेऊन या रोडने वावरावे लागते. तसेच बेशिस्ती मध्ये थांबणा-या गाड्यांवर कारवाही कांही कुणीच करित नाही.यामुळे संबंधित यंत्रणा नसल्यानेच वेडी-वाकडी रोज शेकडो गाड्या थांबलेली असतात. तरी याकडे संबंधितांनी लक्ष घालावे आणि बेधडक कारवाही करावी,अशी मागणी सामान्य जनतेतून होत आहे.

# राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजना

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) - राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन ही योजना १९५४ -५५ पासून सूरू आहे. या योजनेसाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचे सदस्य सचिव हे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी होते. तथापि, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून सर्वसमावेशक अशी एकच सुधारित नियमावली तयार करण्यात आली आहे.

राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार या योजनेचे नाव बदलून राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजना करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत जिल्ह्यातील लाभार्थी निवडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील समिती गठीत करण्यात आली आहे. समितीमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे सदस्य सचिव आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व वृध्द साहित्यिक व कलाकार लाभार्थी यांनी ही योजना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे. यापूढे राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार योजनेच्या मानधन तसेच नवीन प्रस्ताव व इतर बाबींच्या चौकशीसाठी व योजनेच्या लाभा संदर्भामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाज कल्याण विभागाने केले आहे.

# कै. महारुद्र बप्पा मोटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार

परंडा (प्रतिनिधी) - येथील कै. महारुद्र बप्पा मोटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थापक रणजीत मोटे यांच्या हस्ते दि.६ जून रोजी करण्यात आला.



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तालुकाध्यक्ष संदीप पाटील, अॅड सुभाष वेताळ, पंकज पाटील, युवक तालुकाध्यक्ष धनंजय पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक एॅड सुजित देवकते, डॉ रवींद्र जगताप, सोमनाथ सिरसट, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, माजी जिप सदस्य मारुती मासाळ, अप्पा बनसोडे, माजी नगराध्यक्ष नसीरशहा बर्फीवाले, शहराध्यक्ष श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, सामाजिक न्याय जिल्हा सरचिटणीस घणश्याम शिंदे, गनीभाई हावरे, खयुम तुटके, सचिन पाटील, अमोल जगताप, रामभाऊ मुसळे, महेश खुळे, हनुमंत गायकवाड, तालुका युवक उपाध्यक्ष बंडू रगडे, सुधीर वाघमोडे, संकेत कांबळे, प्राचार्य हनुमंत यादव, सलीम शेख, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ नवनाथ वाघमोडे, पत्रकार सुरेश घाडगे, प्रा. सूचित सातपुते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद झोंबाडे यांनी तर आभार पटेल यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यादव सुधीर, प्रा. देशमाने, प्रा. मारकड महादेव, प्रा. अजय मेटकर, प्रा. अजित देशमुख, प्रा. रणजीत देशमुख, प्रा. खैरे, प्रा. मणियार, प्रा. वणवे, सुरवसे, सरडे, जागताप, इतापे, भोरे, हाके, सेवक राजाभाऊ बनसोडे, अशोक कोकणे, देविदास गरड, थोरबोले आदींनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘लसाकम’च्या निवडक कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजन

अहमदपूर दि.७ (कारामुंगीकर) ‘लसाकम’ च्या निवडक कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजन आज शनिवार दि.८ व रविवार दि. ९ जून २ज२४ रोजी सकाळी १ज ते सायंकाळी ०६ या वेळेत अफार्म प्रशिक्षण केंद्र, १२ नंबर पाटीच्या पुढे, बार्शी रोड , लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

संपूर्ण व्यवस्था परिवर्तन हे ध्येय घेऊन लहुजी साळवे कर्मचारी महासंघ (लसाकम ) मागील ३८ वर्षापासून मातंग आणि तत्सम उपेक्षित समुदाय कार्यक्षेत्र मानून निरंतर आणि अथकपणे समाज जागृतीचे काम करीत आहे.

आजपर्यंत अनेक त्यागी आणि समर्पित कार्यकर्त्यांचे याकामी योगदान लाभले आहे. आपल्या महापुरुषांनी चालविलेल्या परिवर्तनवादी चळवळीचे आपण लाभार्थी आहोत आणि ती चळवळ चालविणे आपली सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे .याची जाणिव ठेवून त्यांनी योगदान दिले आहे.

यापैकी कांहीची जीवनयात्रा संपली असून कांहीजण अजूनही यथाशक्ती काम करीत आहेत. अशा कर्मयोग्यांना आपला इतिहास सॅल्युटच करील. समाजाचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य समजावून घेऊन कार्यकर्त्यखने स्वतः कार्यप्रवण होणे आवश्यक असते. जगात आणि आपल्या देशातील मानवी जीवनात होत असलेले बदल लक्षात घेऊन कार्यकर्त्यालाही अपडेट होणे आवश्यक असते. या बाबींचा विचार करून म लसाकम म च्या निवडक कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष एकनाथ पलमटे, जिल्हा सचिव मधुकर दुवे यासह लसाकम लातूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.